# असंघटित कामगार—संघटितांचे कर्तव्य

ह. कृ. परांजपे

भारतातील सरकारी आणि भांडवलवाल्या गोटामधूनच नव्हे तर अनेक वर्तमानपत्रांतून आणि बुद्धिमंतांकडूनसुद्धा संघटित कामगारांवर स्वार्थीपणाचा आणि देशहिताकडे दुर्लक्ष करण्याचा आरोप अनेकदा केला जातो. असे म्हटले जाते की, देशातील एकूण उत्पादनाचा प्रमाणाबाहेर वाटा जे कामगार विशेष संघटित आहेत त्यांच्या पदरात पडतो. त्यांच्या संघटना मजबूत असल्याने सरकारला आणि मालकांना तोंड देऊन, त्याचप्रमाणे कायदेशीरपणे भांडून त्या आपल्या मागण्या मान्य करून घेऊ शकतात. त्याचा परिणाम असा होतो की, वेतन, महागाई भत्ता व इतर सर्व फायदे लक्षात घेता या कामगारांना खरेखुरे, मोठे वेतन मिळते.

या संदर्भात सरकारी क्षेत्रातील अनेक उद्योगधंद्यांतील कामगारांचा विशेष उल्लेख केला जातो. राष्ट्रीय मालकीच्या बँका, आयुर्विमा मंडळ, इत्यादींतील कामगारांवर अनेक मंडळी आरोप करतात की, लायकी आणि काम यांच्या मानाने या कामगारांना अव्वाच्यासव्वा वेतने मिळतात. त्याचप्रमाणे मुंबई-पुण्याच्या आसमंतातील इंजीनियरिंग, इलेक्ट्रॉनिक्स वगैरे कारखान्यांत काम करणाऱ्या कामगारांबाबतही असे म्हटले जाते की, त्यांना जी वेतने मिळतात,—यशस्वी झगडे करून जी वेतने ते पदरात पाडून घेतात— ती या देशाच्या अर्थव्यवस्थेला पेलण्यासारखी नाहीत. अशी वेतने मिळवणाऱ्या वर्गाचा सरकारी तसेच काही अर्थशास्त्रीय गोटात 'उच्च वेतनाची बेटे' ( High Wage Islands ) असा उल्लेख केला जातो. असे म्हटले जाते की, मक्तेदारी— ताकद असणारे कारखानदार अगर व्यापारी ज्या तऱ्हेने गिऱ्हाईकांचे आणि शेवटी अर्थव्यवस्थेचे शोषण करून आपले फायदे वाढवतात, तसेच हे कामगारही आपली भरमसाट वेतने ही सामान्य जनतेच्या, विशेषतः दरिद्री लोकांच्या पिळवणुकीवर मिळवतात.

हा विचार भारतातील सध्याची मूलतः भांडवलशाहीवर आधारलेली अर्थव्यवस्था लक्षात न घेता मांडला जातो. या व्यवस्थेत ज्यांच्या जवळ भांडवल अगर उत्पादनाची दुसरी साधने आहेत अगर ज्यांनी येन केन प्रकरेण राज्यसंस्थेत आपली एक तऱ्हेची खाजगी भागीदारी निर्माण केली आहे, त्या मंडळींच्या खऱ्याखुऱ्या उत्पन्नावर आणि उपभोगावर कोणतेही नियंत्रण उपयोगी पडू शकत नाही. कारखानदार, व्यापारी यांचा वर्ग घ्या, डॉक्टर, वकील, चार्टर्ड अकाउंटंट्स्, यांच्याकडे बघा, संपन्न शेतकरी आणि बागाईतदार यांची उत्पन्ने लक्षात आणा, किंवा राज्यकर्त्यांचा जो एक नवीनच वर्ग देशात वाढत आहे त्यांचे खरे राहणीचे मान बघा. या मंडळींकडून अर्थव्यवस्थेस होणारा फायदा आणि ते अर्थव्यवस्थेकडून घेत असलेले उत्पन्न, यामध्ये काही मेळ दिसतो काय? सरकारने बसविलेले कर अगर नियंत्रणांचा या वर्गांचे वाढते आणि उधळपट्टीचे जीवनमान रोखण्यास थोडा तरी उपयोग होतो काय? या प्रश्नांची उत्तरे उघड आहेत.

अशा या अर्थव्यवस्थेत कामगार वर्गापैकी जे फार थोडे गट आपापल्या संघटना चांगल्या बांधून आहेत, आणि सरकार व मालकवर्गाशी झगडा देण्याची ज्यांची ताकद आहे, अशांनी आपले जीवनमान टिकविण्यासाठी अगर वाढविण्यासाठी प्रयत्न केले, आणि त्यात त्यातील काही यशस्वी झाले, तर त्याचा एवढा बाऊ का करण्यात यावा? असे कोणालाही म्हणता येणार नाही की या कामगारांचे राहणीमान प्रचंड प्रमाणात वाढले आहे. त्यातील अनेकांना इतकेच यश मिळाले आहे की जे वेतनमान झगडा करून त्यांनी मान्य करून घेतले त्यात सततच्या भाववाढीमुळे फार घट त्यांनी होऊ दिलेली नाही; महागाई भत्ता चांगल्या प्रमाणात मिळावा अशी मागणी मान्य करून घेण्यात त्यांच्यातील काहींनी यश मिळविले आहे. फारच छोटा वर्ग असा आहे की ज्यांनी आपली वेतने सतत खरीखुरी वाढवून मिळविली आहेत. अशी स्थिती अशा थोड्या धंद्यामधील कामगारांची आहे की ज्या धंद्यामध्ये मक्तेदारीची स्थिति आहे. या धंद्याची मालकमंडळी मालाचे भाव आपणास योग्य वाटतील तसे वाढवून घेऊ शकतात व मोठे फायदे मिळवू शकतात. अशा धंद्यातील कामगारांनी या मक्तेदारी फायद्यात वाटा मिळवू पाहिला व त्यांना तो मिळाला तर त्यात वाईट वाटण्यासारखे काय आहे? जोवर मक्तेदारी नियंत्रण हे कागदावरच राहते, सरकार जोवर मक्तेदारी फायद्यावर सक्त नियंत्रण करीत नाही, तोवर निदान कामगारांना त्यातला काही वाटा मिळाला तर अन्याय काहीसा कमी होतो असे म्हटले पाहिजे.

परंतु याबरोबरच संघटित कामगारांनी हे विसरून चालणार नाही की, त्यांच्या मागण्या पूर्ण करून घेण्यात त्यांना जे यश मिळते त्यामागे गेल्या ५० वर्षांत वाढलेल्या कामगार चळवळीची, अनेक तऱ्हेच्या झगड्यांची व मजूर—कामगारांना पाठिंबा देणाऱ्या लोकमताची मोठी पूर्वपीठिका आहे. हे सर्व नसते तर त्यांच्या संघटना झोडपून काढणे, त्यांना वाटाण्याच्या अक्षता देणे हे मालकांना व सरकारला अवघड झाले नसते. हे आपल्या लक्षात आले आहे, हे ऋण आपण विसरलेलो नाही, असे दाखवण्याचा संघटित कामगारांपुढे एकच स्पष्ट मार्ग आहे. तो म्हणजे जे कामगारबंधू अजून कमी संघटित अगर असंघटित आहेत त्यांना संघटित होण्यास, आणि त्यांच्या संघटना जेव्हा झगडे करतील तेव्हा त्यामध्ये, त्यांना व्यवस्थित मदत करणे. संघटनेच्या प्रभावाने संघटित कामगाराला जे जास्त वेतन मिळते, त्याचा काही प्रमाणित भाग—पाच अगर दहा टक्के— अशा कामासाठी बाजूला ठेवून असंघटित वा कमी संघटितांना संघटित होण्यास अगर लढे लढवण्यास त्यातून मदत करणे हे त्यांनी स्वतःचे कर्तव्य समजले पाहिजे.

या दृष्टीने एक उल्लेखनीय गोष्ट म्हणजे आयुर्विमा मंडळ, बँका आणि अशा काही संस्थांमधील कामगार—संघटनांनी या तऱ्हेची जबाबदारी स्वीकारण्याचा वाढता प्रयत्न चालवला आहे. त्यांनी 'असंघटित कामगार संघटन समिती' या नावाची संघटना स्थापिली

असून तिचे मार्फत काही तालुक्यांतील असंघटित कामगारांची संघटना करू पाहणाऱ्या कार्यकर्त्यांचे जीवनाचा खर्च अशा फंडातून भागवण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. अजून या प्रयत्नांची केवळ सुरुवात आहे. एक दोनच कार्यकर्ते एक-दोनच विभागात या तऱ्हेने मदत मिळवू शकत आहेत. पण हा विचार जितका प्रसृत होईल तितके जास्त पूर्णवेळ कार्यकर्ते असंघटितांत संघटनेचे काम करू शकतील. जीवनाचा खर्च निघाला म्हणजे असे कार्यकर्ते पुरेसे मिळतील असे मुळीच नाही. असे कार्य करण्याची प्रथा लुप्त झाली नसली तरी कमी नक्कीच झाली आहे. पण निदान असे काम करण्याची ज्यांची तयारी आहे त्यांना रोजच्या पोटापाण्याची विवंचना करावी लागली नाही तर त्यांचे काम काहीसे सोपे होईल. या दृष्टीने हा प्रयत्न फार योग्य आहे असे म्हटले पाहिजे जितके संघटित कामगार व त्यांच्या संघटना हा विचार मान्य करतील तितका देशाचा मोठा फायदा होईल.

या अनुषंगाने आणखी एक विचार थोडक्यात पण आवर्जून मांडला पाहिजे. देशाच्या वेगवेगळ्या भागांतून येणाऱ्या बातम्यांवरून हे उघड होत आहे की विशेषतः ग्रामीण भागांत असंघटित कामगार थोडा संघटित होऊ लागला, जागृत होऊन आपल्या मागण्या पुढे रेट लागला, की मोठ्या प्रमाणावर झगड्याचे वातावरण निर्माण होते. पोलिस आणि बाकी राज्ययंत्रणा बव्हंशी असंघटितांच्या विरुद्ध उभी राहते. त्यातून उद्भविणाऱ्या जुलमाची, छळाची वर्णने हळूहळू वर्तमानपत्रांतून पुढे येऊ लागली आहेत. पण या प्रसिद्धीचा किंवा राज्य विधिमंडळातील अगर संसदेतील चर्चांचा विशेष फायदा होतो असे दिसत नाही.

हे असेच चालू राहिले तर या संघर्षाला हळूहळू हिंसेचे आणि यादवी युद्धाचे वळण लागू शकेल. उत्तर प्रदेश, बिहार, मध्यप्रदेश यांमधील दरोडेखोर आणि डाकूंच्या टोळ्या, त्यांचे आपसांतील त्याचप्रमाणे पोलिसांशी होणारे समरप्रसंग, यांची संख्या वाढती आहे. भ्रष्टाचारी राज्ययंत्रणेकडून आपणास न्याय मिळण्याची शक्यता नाही अशी भावना झालेले अनेक लोक आपणावरील अगर आपल्या कुटुंबावरील अन्यायाचे परिमार्जन करण्यासाठी कायदा हातात घेऊन बदला घेतात आणि मग शिक्षा चुकवण्यासाठी दरोडेखोरांच्या टोळीत सामील होतात. असेही दिसून येते की, यातील अनेक व्यक्ती या सामान्य लोकांस त्रास देत नाहीत; उलट सरकारी अगर संपन्न व्यक्तींस केवळ त्यांचा उपसर्ग होतो. अशा स्थितीत काहीशा भीतीने, पण काही आदराने सामान्य जनता या टोळ्यांकडे पाहते. काही भागात तर त्यांना पूर्वीच्या उमाजी नाईकाप्रमाणे 'बागी' मानले जाते. उत्तर भारताच्या अनेक जिल्ह्यांमध्ये आज अशा टोळ्या मोठ्या प्रमाणात वावरत आहेत आणि सरकार त्यांचा प्रतिबंध करू शकत नाही.

जर असंघटित कामगार, हरिजन, गिरिजन यांवरील अत्याचार चालू राहिले, संघटना होऊनही त्यांच्या मागण्या मान्य करण्याऐवजी संपन्न वर्ग आणि सरकार यांच्या हातमिळवणीने त्यांना दडपण्याचा प्रयत्न चालू राहिला, तर त्याला हिंसात्मक विरोध करण्याशिवाय दुसरे उत्तर राहणार नाही. राज्यकर्त्यां आणि संपन्न वर्गांनी हे विसरून चालणार नाही. चंबळच्या खोऱ्यात जे होते ते कृष्णेच्या खोऱ्यात होणारच नाही, असे कोणी धरून चालू नये ! ◎ ◎


## १ मे महाराष्ट्र राज्य दिन

## आणि

## कामगार दिन

## त्यानिमित्त शेतकरी व कामकरी बांधवांस शुभेच्छा !

★

# केमिकल मजदूर सभा

दादर, मुंबई ४०० ०१४

# कामगार–संघटित व असंघटित

बा. न. राजहंस

भारतामध्ये आज मोठ्या प्रमाणात कामगार असंतोष असल्याचे व परिणामी संप व बंद ही आंदोलने दिवसेंदिवस वाढत चालल्याचे दिसून येते. मुंबईच्या गिरणीधंद्यातील अडीच लाख कामगारांचा तीन महिन्यांपेक्षा अधिक काळ चाललेला संप हे याचे ढळढळीत उदाहरण होय. वाढत्या महागाईमुळे या कामगारांना आपल्या पगारात सुमारे ३०० रु. मासिक वाढ पाहिजे व ती देण्याचे मालकांनी नाकारल्यामुळे हा संप आहे. या संपाच्या इष्टानिष्टतेचा विचार किंवा मागण्या योग्य आहेत किंवा नाही याबद्दल पुष्कळ उलटसुलट लेख आणि वक्तव्ये प्रसिद्ध झाली आहेत. आज महागाई इतकी वाढली आहे की मुंबई-सारख्या शहरात द. म. १००० रु. कमवूनही कोणालाही आपले कुटुंब चालवणे शक्य नाही. त्यामुळे उद्रेक होणे स्वाभाविक आहे. या उद्रेकाचा पाठपुरावा करणारे अनेक कामगार पुढारी व राजकीय नेते आहेत. पण याच वेळी देशात जे कोट्यावधी असंघटित कामगार आहेत त्यांच्या परिस्थितीचा विचार करण्यास कोणी फारसे पुढे येत नाहीत ही दुर्दैवी गोष्ट म्हणावी लागेल. म्हणून या लेखात संघटित व असंघटित कामगारांच्या परिस्थितीचा तौलनिक अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

१९८० च्या खानेसुमारीप्रमाणे भारताची लोकसंख्या ६९ कोटी आहे. त्यात काम करणाऱ्यांची म्हणजे श्रमिकांची संख्या २६ कोटी आहे. या २६ कोटींपैकी संघटित क्षेत्रात काम करणाऱ्यांची संख्या फक्त दोन कोटी तीस लाख असून बाकीचे सुमारे २४ कोटी श्रमिक असंघटित क्षेत्रांत काम करीत आहेत. संघटित क्षेत्रात मोठमोठे कारखाने, रेल्वे वाहतूक वगैरेंचा समावेश होतो, तर असंघटित क्षेत्रात शहरामध्ये काम करणारे, हमाल, विडी कामगार, हॉटेल कामगार, दुकानातील नोकरवर्ग व खेड्यातील शेतमजूर, बलुतेदार व श्रमिक शेतकरी यांचा समावेश होतो. म्हणजे एकूण श्रमिकांपैकी जेमतेम १० टक्के श्रमिक संघटित क्षेत्रात आहेत तर काम करणाऱ्या १०० लोकांपैकी ९० लोक असंघटित क्षेत्रात आहेत व त्यांची परिस्थिती काय आहे हे समजून घेणे आवश्यक ठरेल.

१९७८ सालच्या एका पाहणीनुसार भारतामधील संघटित कामगारांचे सरासरी वार्षिक उत्पन्न ५७९७ रु. असल्याचे आढळून आले. तर त्याच पाहणीनुसार देशातील नागरिकांचे सरासरी वार्षिक उत्पन्न फक्त १९१९ रु. असल्याचे दिसुन आले. त्याच काळात शेतमजुराचे सरासरी वार्षिक उत्पन्न जेमतेम २०० रु. होते. मुंबई शहरात आज बँकेतला शिपाई किंवा मोठ्या इंजिनिअरिंग कारखान्यात काम करणारा अकुशल कामगार द. म. १००० रु. पेक्षा जास्त वेतन कमावतो. त्याचवेळी मुंबई शहरात विडी वळणाऱ्या कामगाराला रोज केवळ १२ रु. मिळतात. पुणे शहरामध्ये विडी कामगाराचे वेतन दर-रोज ८ ते १० रु. पडते. छोट्या-छोट्या हॉटेलात काम करणाऱ्या कामगारांची परिस्थिती तर यापेक्षाही वाईट आहे आणि ग्रामीण भागात जे लाखो शेतमजूर काम करतात त्यांचे किमान वेतन आज रोज केवळ ४ ते ५॥ रु. इतकेच आहे. या किमान वेतनामध्ये वाढ करून ते अनुक्रमे ६ ते १० रुपये इतके वाढवावे अशी शिफारस शासनाकडे करून तीन महिने झाले, पण शासनाने अद्याप त्यावर निर्णय घेतलेला नाही.

संघटित क्षेत्रातील कामगारांना सामाजिक सुरक्षिततेच्या इतर काही सवलती उपलब्ध आहेत. विशेषतः गेल्या पन्नास वर्षांत संघटित कामगारांनी जी चळवळ केली त्यामुळे या क्षेत्रात नोकरीची शाश्वती जवळ जवळ सर्वत्र उपलब्ध आहे. याखेरीज घरभाडे भत्ता, आजारी-पणाची रजा, औषधपाण्याची सोय, बाळंतपणाची रजा, सुटीतील प्रवासासाठी सवलत, वगैरे हक्क संघटित कामगारांनी कमावले आहेत. पण असंघटित कामगारांना यापैकी कोणतेही हक्क आज उपलब्ध नाहीत. नोकरीची शाश्वती त्यांना नाही हॉटेलमधील पोऱ्याला मालक केव्हाही लाथ मारून काढून टाकतो त्याची कोणी दाद घेत नाही. विड्या वळण्याचे काम अंगावर असते. मालकाने पुरेशी तंबाखू दिली नाही, पाने कमी दिली तर त्याच्या अगोदरच्या तुटपुंज्या उत्पन्नात कपात होते. शेतमजुरांना तर वर्षातून केवळ १३० ते १५० दिवस काम मिळते व त्याला रोज निरनिराळ्या मालकाकडे कामासाठी फिरावे लागते. असंघटित कामगारांना औषधपाण्याची किंवा घरभाडे भत्त्याची वा कामावर जाण्यासाठी प्रवासभत्त्याची किंवा वाहनाची कोणतीही सोय नाही. तो आजारी पडला तर त्याने स्वतःच्या खर्चाने औषधपाणी केले पाहिजे व आजारीपणात विना वेतन घरी राहिले पाहिजे. असंघटित कामगारांपैकी महिला प्रसूत झाली तर तिला आपले १० दिवसांचे तान्हे मूल घेऊन कामावर यावे लागते. बांधकाम, रोजगार हमी, शेतमजुरी अशा क्षेत्रांत बऱ्याच महिला आपली तान्ही मुले कामावर घेऊन येतात व तेथे मातीत खेळतात. ह्याचा परिणाम त्यांच्या प्रकृतिवर होतो संघटित क्षेत्रांत महिलां-साठी पाळणाघरांची तरतूद आहे, पण मी अनेक विडी कारखान्यांतील बाया आपली लहान मुले जवळ घेऊन विड्या वळताना पाहिली आहेत. तंबाकूच्या खकाण्यात बालपणापासून वावरणाऱ्या या मुलांना पुढे क्षयरोगाने पछाडले तर त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काय ?

आज मुंबई, पुणे, बंगलोर अशा मोठमोठ्या शहरांतील सरकारी व निमसरकारी कारखान्यांत कामावर जाणाऱ्यांना सवलतीच्या दराने कामावर जाण्याची सोय त्या त्या कंपन्यांमार्फत करण्यात येते पण असंघटित क्षेत्रात व विशेषतः ग्रामीण भागात मजुराला कामावर पोचण्यासाठीच चारचार–पाचपाच किलोमीटर पायपीट करावी लागते. महाराष्ट्रामध्ये रोजगार हमीवर काम करणाऱ्या लक्षावधी कामगारांना रोज किमान चारपाच मैलांची पायपीट केल्यावर काम

मिळते व तेथेही त्यांना जड श्रमाचे काम करावे लागते. जाण्यायेण्यात त्यांचे सुमारे तीन तास जातात व आठ तास कामाचे म्हणजे दिवसाचे ११ तास घालवल्यावर ह्यांना रोज जेमतेम ४ ते ५ रु. मिळतात.

असंघटित कामगारांचे जीवन म्हणजे नुसते कष्ट. घाम गाळून अर्धपोटी जगणे होय. असंघटित कामगारांपैकी एक रिक्षा ओढणारांचा जो वर्ग आहे ह्याचे कष्टाचे जीवन पाहून तर मन बेचैन होते. भारतामधील मोठमोठ्या शहरांमध्ये आज सुमारे १० ते १५ लाख सायकल रिक्षा ओढून आपले जीवन कंठणारे कामगार आहेत. कलकत्त्यांत तर माणसाने बैलाप्रमाणे ओढावयाच्या रिक्षा आहेत. या रिक्षा ओढणाऱ्या कामगाराने रोज जेव्हा आठ ते दहा तास अक्षरशः घाम गाळावा व छातीचा भाता करावा, तेव्हा त्याला जेमतेम १० रु. मिळतात. रिक्षा ओढणाऱ्या बहुतेक कामगारांना वयाच्या ३० व्या वर्षाच्या आसपास क्षय होतो. या बहुतेक कामगारांना कोणा ठेकेदाराकडून रिक्षा भाड्याने घ्याव्या लागतात व कामगारांच्या घामावर हे ठेकेदार हजारो-लाखो रुपये कमावतात. या श्रमिकांच्या मालकीच्या रिक्षा व्हाव्यात म्हणून अद्यापपर्यन्त संघटित कामगार वर्गाने किंवा शासनानेदेखील काही भरीव पावले उचललेली नाहीत.

संघटित कामगारांना संरक्षण देणारे, औद्योगिक कलहनिवारण कायदा, प्रॉव्हिडंट फंड कायदा, ग्रॅच्युइटीचा कायदा, बाळंतपणाच्या सवलतीचा कायदा, खाणकामगारांचा कायदा, एम्प्लाईज स्टेट इन्शुअरन्स ॲक्ट असे अनेक कायदे आहेत व या कायद्यांचे संरक्षण त्यांच्या पदरात पाडून देणाऱ्या त्यांच्या युनियन्स व वकील मंडळी आहेत. या कायद्यामध्ये अनेक उणीवा असल्या तरी संघटित कामगारांचे जीवन थोडे सुसह्य व्हावे इतपत या कायद्यांचा फायदा त्यांना होतो.

असंघटित कामगारांना संरक्षण देणारे कायदे फार थोडे आहेत व त्यांची अंमलबजावणी जवळजवळ अभावानेच होते. असंघटित कामगारांना संरक्षण देणारा सर्वांत महत्त्वाचा कायदा म्हणजे किमान वेतन कायदा. या कायद्यानुसार राज्यसरकारला कोणत्याही असंघटित धंद्यातील कामगारांचे वेतनमान ठरविण्यासाठी त्रिपक्षीय कमिटी नेमून वेतनमान मुक्रर करता येते. या कमिटयांचे आजपर्यन्तचे अहवाल पाहिले तर वेतनाचे झुकते माप कधीही कामगाराच्या बाजूचे पडलेले दिसत नाही. महाराष्ट्रात नुकतीच विडी कामगारांच्या किमान वेतनात सुधारणा करण्यात आली तेव्हा विडी कामगाराला मोठ्या उदारपणाने ६ रु. ७५ पैसे वेतन देण्यात आले. जंगलखात्यामधील कामगारांचे किमान वेतन गेल्या वर्षी सुधारण्यात आले तेव्हा त्याना ग्रामीण भागात ६ रु. ६० पैसे व शहरी भागात ८ रु. ७० पैसे मिळतात. शेतमजुरांच्या किमान वेतनाचा उल्लेख वर करण्यात आलाच आहे. किमान वेतनाच्या बाबतीत आणखी एक सार्वत्रिक तक्रार आहे. अगोदरच तुटपुंजे असलेले हे किमान वेतन प्रत्यक्षात त्याच्या पदरात कधीच पडत नाही.

असंघटित कामगारांच्या बाबतीत किमान वेतन कायद्याची अंमलबजावणी जवळ जवळ होत नाही. त्यामुळे कायद्याने ठरवलेले किमान वेतन व प्रत्यक्षात मिळणारे किमान वेतन, यांत फार फरक दिसून येतो. शेतमजूर चौकशी आयोगाने केलेल्या पाहणीनुसार १९७४–७५ साली स्त्रियांना मिळणारे प्रत्यक्ष दैनिक वेतन केवळ २ रु. २७ पैसे तर पुरुषांना मिळणारे दैनिक वेतन केवळ ३ रु. २४ पैसे असल्याचे आढळून आले. याच काळात देशात कोठेही शेतमजुरांचे ठरवलेले किमान वेतन ४ रु. पेक्षा कमी नव्हते. किमान कायद्याखेरीज माथाडी कायदा, विडी व सिगारेट कायदा असे काही कायदे असंघटित कामगारांसाठी पास झालेले आहेत. पण या कायद्यांचे अमलबजावणीचे संदर्भात मालक वर्गाने अनेक ठिकाणी हायकोर्टातून स्थगिती आणल्यामुळे हे कायदे पास होऊन वर्षानुवर्षे झाली तरी त्याची अंमलबजावणी होत नाही व या बाबतीत संघटित कामगार चळवळ किंवा गरिबांच्या नावाने विधान सभांत निवडून गेलेले आमदार यापैकी कोणीही अद्याप प्रभावी आवाज उठवलेला नाही.

बहुतेक संघटित कामगारांना वृद्धापकाळी प्रॉव्हिडंट फंड, पेन्शन किंवा ग्रॅच्युइटी यापैकी एक किंवा जादा फायदे मिळतात व त्यांना वृद्धापकाळी थोडा तरी आधार राहातो. पण असंघटित कामगारांना वृद्धापकाळाची कोणतीही सोय नाही. शरीर थकेपर्यन्त काम करावयाचे व थकल्यानंतर कोणी संभाळले तर जगावयाचे, नाहीतर उपाशी राहावयाचे वा भीक मागावयाची अशी असंघटित कामगारावर पाळी येते.

सारांश, भारतात कष्ट करणाऱ्या सुमारे २४ कोटी असंघटित कामगारांना कामाची शाश्वती नाही. पुरेसे वेतन नाही, सामाजिक सुरक्षिततेच्या सोयी नाहीत. कायद्याचे संरक्षण नाही— अशा भयानक अवस्थेत अर्धपोटी व अपुऱ्या वेतनावर राहावे लागते. या लोकांना संघटित करण्याचे काम फार कठीण व किचकट आहे. त्यासाठी माणसे, साधने व पैसा उभा करणे या असंघटित कामगारांना शक्य नाही. त्यांच्या वतीने देशात किंवा विधिमंडळात प्रभावी आवाज उठवणारे कोणी नसल्यामुळे शासनही त्यांचे संदर्भात फारशी परिणामकारक उपाययोजना करीत नाही. वस्तुतः संघटित कामगार चळवळीने या लोकांच्या प्रश्नांत विशेष लक्ष घालणे आवश्यक आहे. 'जगातील कामगारांनो एक व्हा!' अशा घोषणा देणारी आमची संघटित कामगार चळवळ याच देशातील कोट्यावधी असंघटित कामगारांच्या भवितव्याबद्दल इतकी उदासीन असावी याचे दुःख होते. संघटित कामगार आपल्या निरनिराळ्या प्रश्नासाठी अनेक संघर्ष करतात. आघाड्या बनवतात. पण असंघटित कामगारांचे दोनतीन मूलभूत प्रश्न घेऊन त्यावर राज्यव्यापी किंवा देशव्यापी आघाडी उघडण्याचा व त्या आधारे आवाज उठवण्याचा साधा विचारदेखील अद्याप संघटित कामगार चळवळीत झालेला नाही. तसेच आज देशाच्या विविध विधिमंडळांत गरिबांच्या नावाने बोलणारे शेकडो विधायक कार्यकर्ते आहेत. पण त्यांच्यापैकीदेखील कोणी या व्यासपीठांचा वापर करून असंघटित कामगारांचा आवाज उठविण्याचे व त्यांना न्याय देण्याचे प्रभावी काम केलेले नाही. ◎ ◎

## अभिनंदन

हिंदळे येथील नानासाहेब गोरे यांच्या वास्तूमधील आरोग्य-केंद्राचे संचालन गेली दोन वर्षे करणारे डॉ. अरुण गुमास्ते यांचा विवाह सुमती जाधव यांच्याशी मुंबई मुक्कामी झाला. वर ब्राह्मण व वधू भंडारी आहे. अनेक मित्रमंडळींनी ह्या नवविवाहितांचे शुभचिंतन केले. पुण्यामध्ये श्री किशोर पत्रार आणि मालती पवार यांचे कनिष्ठ चिरंजीव श्री अभय आणि श्री रमणलाल आणि शकुंतला मोतीवाले यांची कन्या स्वाती यांचा विवाहोत्तर सत्कार समारंभ पुणे येथे मोठ्या आनंदात पार पडला. 'साधना'चे शुभचिंतन! ◎ ◎

# महाराष्ट्रातील शेतकरी हवालदिल

**राजाराम भिला पाटील**

महाराष्ट्र अत्यंत खडकाळ व मुरमाड असून स्वातंत्र्यानंतर आजतागायत १५ ते २० टक्के देखील शेतीस पुरेसे पाणी मिळत नाही. निसर्गावरची शेती म्हणजे एक प्रकारे जुगार! केव्हा गारपिट, अतिवृष्टी, अनावृष्टी, पिकावरील रोगराई, वादळ एक ना दोन अनेक संकटांतून कशीबशी तो शेती पिकवतो. कारण दुसरा धंदा नाही. म्हणून नाईलाजाने शेती करतो. आज जगामध्ये सर्व धंद्यांत फक्त शेतीत भ्रष्टाचार होऊच शकत नाही. महाप्रयासाने ऊन, थंडी, पाऊस हे सर्व सहन करून तो आपली शेती पिकवतो. मात्र स्वातंत्र्यात आजही मार्केटचे दृष्टीने स्थिरता नाही. एक फक्त ऊस, साखर धंदा सोडला तर त्याच्या पिकाचे पक्क्या मालात रूपांतर झाले नाही. मार्केटमध्ये केव्हा किती कमी व किती जास्त भावात शेतीमाल विकला जाईल यासंबंधी निश्चित असे सरकारी धोरण नाही. त्यामुळे आपला शेतीमाल केव्हा विकावा, ह्यासंबंधी तर त्यांची अवस्था अत्यंत भांबावल्यासारखी झालेली आहे. केव्हा कपाशीची व कांद्याची एकाधिकार खरेदी योजना सुरू होईल व केव्हा बंद होईल हे निश्चित नाही. महाराष्ट्रात विशेषतः अनियमित पावसामुळे काही भागात भुईमूग, कपाशी हे पुरेसे येत नाही. तशात भारत देश कृषिप्रधान असताना व ७५ टक्के लोक शेतीवर अवलंबून असताना आजचे सरकार कापूस, साखर, धान्य, तेल, इत्यादी बाहेरून मागविणार व देशातील शेती धंदा उद्ध्वस्त करणार की काय? अशी भीती शेतकऱ्यास वाटायला लागली आहे. गेल्या काही दिवसांपूर्वी जनशक्ती पेपरमध्ये मध्यवर्ती सरकारने महाराष्ट्र सरकारला स्पष्ट बजावले की, शेतीमालाचे भाव वाढवू नये. मी असे म्हणेन की, जो धंदा भारतामध्ये ७५ टक्के लोकांचा आहे, त्यांची ही स्थिती तर देश अधोगतीला जाणेचे लक्षण आहे! इस्राईलसारखा भाग अत्यंत निकृष्ट व कमी पावसाचा असताना मात्र तेथील शेती धंदा अत्यंत समृद्ध होऊ शकतो. शेतकरी म्हणतात, देशात तर आमदार, खासदार शेतकऱ्यांचीच मुले आहेत मग असं का? याला उत्तर माझे मते सर्कशीतील सिंह व अन्य जनावरे एकच रिंग मास्टर खेळवितो ती अवस्था आज आमदार, खासदारांचीच आहे. हातच्या कंकणाला आरसा कशाला? याची गरज नाही. महाराष्ट्रात कोण मुख्यमंत्री असावा हे जादा सांगण्याची गरज आहे असं मला वाटत नाही. रिंग मास्टरला शेती धंद्याची कितपत जाण आहे?

शेतीमालाचे काय भाव असावेत? शेतीमालाचे भाव ठरविताना या देशातील अर्थरचना बदलली पाहिजे असं मला वाटते. कारण उत्पादक व ग्राहक या दोघांना परवडतील असे शेतीमालाचे भाव असावेत. ज्याप्रमाणे इतर सर्व पक्क्या मालाचे (कपडा, सिमेंट, लोखंड, मशिनरी, औषधे) इत्यादी वस्तूंचे भाव खर्च वजाजाता ठरवले म्हणजे हा प्रश्नच येत नाही. तसेच पंतप्रधान, राष्ट्रपती आणि सर्वसामान्य दरिद्री माणूस या दोघांचे कमी व जास्त अंतर, खर्च व पगार किती असावे हे देखील निश्चित केले गेले पाहिजे. नोकरीवरील लोकांनी संप करून आपले प्रश्न सोडवून घ्यावे. शेतकरी व शेतमजुरांची शेती हा धंदा उदयास आला त्या दिवसापासून भांडवलदार, दलाल व सरकार एकप्रकारे दिवसाढवळ्या शेतकऱ्यांची लूट करीत आहेत. देशात सर्वात जर निराशेचे जीवन असेल ते शेती धंद्यात आहे. त्यामुळे आजचा सुशिक्षित वर्ग शेती (बिनपाण्याची) धंद्यात वर येऊ शकत नाही. माझे मते लोक बाहेर प्रांतात कपाशी का नेतात? तर तेथे एकाधिकार लवकर सुरू होत नाही व बाहेर प्रांतात जादा भाव मिळतो म्हणून नेतात. यावर उपाय म्हणजे सर्व देशभर ही योजना लागू केली पाहिजे. कापूस एकाधिकार म्हणून भांडवलदारांच्या विरुद्ध आजचे सरकार जावयास तयार नाही. उलट शेतीवर सीलिंग, शहरी संपत्तीबद्दल मात्र सरकारने काही केले नाही. आजच्या सरकारचे भांडवलदारांचे अनेक नमुने आहेत.

महाराष्ट्रामध्ये दुधाच्या धंद्याची काय अवस्था आहे? ग्राहकास महाग व गाई-म्हशी पाळणारास स्वस्त-धवल क्रांती यशस्वी व्हावयाची असेल तर केवळ कर्ज देऊन प्रश्न सुटेल इतके ते सोपे नाही. आज हा धंदा सरकारी पद्धतीने यशस्वी करण्याचा प्रयत्न चालू आहे. पण अशी उदाहरणे आहेत की, संस्थांचे पदाधिकारी दूध अथवा अन्य शेतीमाल संस्थेमार्फत न देता खाजगीरीत्या विकतात. यामुळे काही संस्था तर आज वाटेल तसे कर्ज देऊन डबघाईस आल्या आहेत. इतकेच नव्हे तर संस्थांची मालमत्ता विकण्यापर्यंत पाळी काही ठिकाणी आली आहे. हा सुद्धा फार मोठा भ्रष्टाचार आहे.

### महाराष्ट्रातील ऊस उत्पादकांची अवस्था

महाराष्ट्र सरकारने एक महिना कारखाने उशीरा सुरू केल्यामुळे आज ऊस उत्पादकांना (ज्यांचा ऊस उभा आहे) रात्रीची झोप येत नाही. शिवाय साखर धंद्याविषयी सरकारचे अनिश्चित धोरण आणि पुन्हा सहकारात फारच अन्याय. विरोधी सभासद, कर्मचारी, अगर अन्य अशा लोकांवर बुद्धिपुरःसर अन्याय केला जातो. बेलगंगेतच बोलकी उदाहरणे आहेत. एका ऊस उत्पादकाने वकीलामार्फत सर्व डायरेक्टरांना नोटिशीद्वारे ऊस तोडणीचे अन्यायासंबंधी कळवले आहे. ॲडव्हान्स देताना बुद्धिपुरःसर काहींना दिला जातो व काहींना दिला जात नाही. तसेच ऊस-तोड काहींच्या आधी तर काहींच्या मागे. विशेषतः पूर्वीचे बोर्डाचे धोरण कमी पाण्याच्या भागातील ऊस आधी तोडणेसंबंधीचे असताना त्यांचा मात्र विचार होत नाही. ही खेदाची बाब आहे. महाराष्ट्रात सर्वात जळगाव जिल्ह्यात अत्यंत कडक उन्हाळा असतो. दीड वर्षांपर्यंत ऊस संभाळीत असताना त्यात अनेक उंदरांनी नळे पाडलेले दिसून येतात. त्यामुळे कमालीचा प्रयत्न करून देखील त्यात शेवटपर्यंत पाणी जात नाही. वाळायला सुरवात झाली की त्याचे टनेज कमी होणार. शेवटी केलेल्या खर्चाइतके तरी उत्पन्न

येईल किंवा नाही अशी शंका ! त्यात मी असेही म्हणेन की, ज्याचे जेवढे शेअर्स असतील तेवढे तरी ऊस त्वरित तोडले गेले पाहिजे. नाहीतर पाच शेअर्स आणि पंधरा एकर हा देखील लहान अल्प भूधारक शेतकऱ्यावर एक प्रकारे अन्यायच आहे. नाही तर नाईलाजाने शेतकऱ्यांनी त्वरित आपले कारखान्याकडे व सरकारकडे लेखी नोटिसा पाठवाव्या व सरासरी एकरी उत्पन्न भरून घ्यावे. पुरेसे पाणी असताना देखील पिलखोडजवळील ऊस जादा मुदतीमुळे वाकल्यासारखा दिसत आहे. तसे आज शेतकऱ्यांचे भावासंबंधी अन्य पक्ष व काही स्वतंत्र म्हणवणारी मंडळी प्रयत्न करीत आहेत. कोणी म्हणतो गाड्या आडवा, रस्ते आडवा, कोणी सत्याग्रहाचे मार्गाने प्रश्न सोडवावा म्हणतो. म्हणजे या सर्वांनी एकत्र येऊन शेतकऱ्याचे प्रश्न सोडवावे. रस्ते आडवले, लाठीहल्ला होऊन तो गोळीबारात मारला जातो शेवटी त्याच्या स्मशानावर पोळी भाजणारे देखील आज आहेत. मी हे म्हणेन की, हुतात्मा होऊन प्रश्न सुटणार असेल तर मी देखील हुतात्मा होण्यास तयार आहे. पण तसे घडणार आहे काय ? नाहक बिचारे बळी जातात !

वरील सर्व प्रश्नांचा विचार करता देशात राष्ट्रप्रेम, माझा देश म्हणून काम करण्याची प्रवृत्ती मग मजुरापासून तो राष्ट्रपतीपर्यंत जो मनुष्य जेथे असेल त्याने आपले काम भाकस बुद्धीने, भ्रष्टाचार न ठेवता निःस्पृह वृत्तीने केले तर काही प्रमाणात प्रश्न सुटेल. शेती धंदा निसर्गावर अवलंबून असल्यामुळे तो एक प्रकारे जुगार आहे ! शेती धंदा वरीलप्रमाणे यशस्वी झाल्यास देश समृद्ध होईल असे मला वाटते.

◎ ◎

# न्यायाचा तराजू तोलाईदाराच्या हाती परंतु स्वतः न्यायापासून वंचित

बापू मगदूम

तोलाईदार म्हणून काम करणारा हा वर्ग महाराष्ट्रातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये काम करीत असून काही ठिकाणी त्याला मापाडी किंवा तोलार म्हणून संबोधण्यात येते. तोलाईदार म्हणून काम करणाऱ्यास बाजार समितीचे लायसेन्स घेतल्याशिवाय काम करता येत नाही. महाराष्ट्रातील सर्व बाजार समित्यांमध्य मिळून सुमारे आठ ते नऊ हजार लोक तोलाईदार म्हणून काम करीत आहेत.

शेतकऱ्यांचा माल बाजार समितीमध्ये आल्यावर त्याच्या मालाचा सौदा झाल्यानंतर त्या मालाचे दलाल व खरेदीदार यांच्या समोर वजन-मापन करून मालाच्या वजनाच्या पावत्या देणारा म्हणजे तोलाईदार. या तोलाईदारास शेतकरी व व्यापारी यांचेमधील न्याय देणारा दुवा समजला जातो. हा वर्ग थोडा सुशिक्षित असावा लागतो.

बाजार समित्यांमध्ये तोलाईदार म्हणून लायसेन्स घेवून काम करीत असला तरी त्याला काम दिलेच पाहिजे असे अगर कामाचा योग्य मोबदला दिलाच पाहिजे असे बंधन बाजार समितीवर नाही. असेल काम तर मिळेल दाम, या पद्धतीने त्याला काम करावे लागते. बाजार समितीने जो दर ठरवून दिला आहे त्याच दरात त्याला तोलाईची मजुरी मिळते. त्याच्यापेक्षा जास्त मजुरी त्याला घेता येत नाही.

तोलाईदार किंवा मापाडी याला बाजार समिती स्वतःचा नोकर म्हणवून घेण्यास तयार नाही. मात्र तोलाईदाराला बाजार समित्याची सर्व बंधने पाळावी लागतात. उदा. काम वेळेवर सुरू करणे, परवानगी शिवाय गैरहजर न राहाणे, इत्यादी बंधने त्याला पाळावी लागतात. मात्र काम नसेल त्या दिवसाचे हजरीचे वेतन त्याला मिळत नाही.

महाराष्ट्र शासनाच्या पणन संचनालयामार्फत बाजार समित्यांचा कारभार चालविला जातो. महाराष्ट्र शासनाच्या पणन संचालकामार्फत तोलाईच्या व हमालीच्या कामाच्या दराची मर्यादा ठरवून देण्यात येत परंतु बहुसंख्य बाजार समित्यांमध्ये त्या मर्यादेपर्यंत तोलाई व हमालीचे दर देत नाहीत. या बाबतीतही पणन संचालक काही करू शकत नाहीत.

वर्षानुवर्षे काम करूनही त्याला ना रजा, ना सुट्ट्या; प्रॉव्हिडंट फंड, ग्रॅच्युइटी, पेन्शन वगैरे कसल्याही प्रकारची सोय अगर स.्रत या वर्गाला मिळत नाही. वयाच्या ऐन उमेदीच्या काळात कामाला लागला तरी उतारवयात काम होत नाही, म्हणून त्याला मजुरी करण्याचे लायसेन्सही मिळत नाही; त्यामुळे ३०–४० वर्षे काम करूनही अत्यत नाईलाजास्तव शर्ट झटकत घरी परतावे लागते !

महाराष्ट्रातील बहुसंख्य बाजार समित्यांमध्य या तोलाईदाराकडून काटापट्टी बुकाचे पैसे वसूल केले जातात. तोलाईदाराला कार्बन, बॉलपेन, कागद वगैरे स्वतःचे खर्चाने आणावे लागते. रेकॉर्ड बाजार समित्यांचे पैसे मात्र तोलाईदारांना द्यावे लागतात. काही ठिलाणी तोलाईदारांना स्वतःची काटा-पारडी व वजने स्वतःच्या खर्चाने आणावी लागतात. या सर्व वस्तू खांद्यावर घेऊन व्यापाऱ्यांच्या दारोदार वजन करीत हिंडावे लागते.

बाजार समित्यांमध्ये किती हमाल व तोलाईदार असावेत हे फार वर्षांपूर्वी–सुमारे वीस-बावीस वर्षांपूर्वी महाराष्ट्र शासनाच्या पणन संचालकाने एक परिपत्रक काढले असून त्या परिपत्रकाचा आधार घेऊन तोलाईदारांची संख्या वाढवण्याबाबत मनमानी कारभार बाजार समित्या करत असतात. इतरत्र महागाई वाढली की, पगार, महागाई-भत्ता वाढ मिळतो मात्र तोलाईदारांच्या मजुरीत दिवसेंदिवस घटच होत आहे, कारण तोलाईदारांची संख्या वाढली की मिळणारी मजुरी विभागून जाते. असा हा उपेक्षित जिणे जगणारा शेतकरी व व्यापारी यांना समान न्याय देण्यासाठी न्यायाचा तराजू हातात घेतलेला तोलाईदार त्याला मात्र स्वातंत्र्य मिळून ३०–३१ वर्षे होऊन गेली तरीही न्याय पासून वंचित राहावे लागले आहे. या तोलाईदारात स्वातंत्र्य सैनिकही आज उपरेपणाने काम करून जीवन कंठीत आहेत. ◎

# असंघटित कामगारापुढील समस्या

वसंत खानोलकर

भारतात सुमारे पंचाहत्तर टक्के औद्योगिक कामगार असंघटित आहेत. शेतमजुरांचा समावेश केल्यास संघटितांचे प्रमाण आणखी बरेच घटल, शिवाय छोट्या छोट्या उद्योगधंद्यांतील व ग्रामीण भागातील ज्या काही संघटना आहेत त्याही कमजोर आहेत. कामगार चळवळीपुढे ज्या काही महत्त्वाच्या समस्या आहेत त्यांमध्ये दुर्बल कामगारांच्या संघटनांना सहाय्य करणे व असंघटितांना संघटित करणे या समस्येचाही समावेश होतो.

## दुर्बलांतील संघटना

महाराष्ट्राचेच उदाहरण घेऊ. शहरी किंवा विकसनशील भागात, एकाच कारखान्यात वा संस्थेत जरी नसले, तरी एकाच प्रकारच्या व्यवसायात व एका परिसरात काम करणारे, पण दुर्बल घटकात मोडणारे कामगार काही प्रमाणात संघटित आहेत. मुंबई शहरातील हॉटेल कामगार, गुमास्ते, डोक्यावरून ओझी वाहणारे माथाडी कामगार, ठेकेदारी पद्धतीखाली काम करणारे कामगार, किरकोळ मुदतीसाठी नेमले जाणारे (कॅज्युअल) कामगार, महाराष्ट्रातील काही थोड्या केंद्रांतील हमाल, राज्यातील निरनिराळ्या केंद्रात काम करणारे विडी कामगार, भिवंडी–इचलकरंजीसारख्या ठिकाणी काम करणारे यंत्र–माग कामगार वगैरे कामगारांचा यात समावेश होतो. शहरी व निम–शहरी विभागात छोट्या प्रमाणावर चालणाऱ्या कारखान्यांतील कामगारांचाही यात समावेश होतो. अशा या संघटनांतही ज्यांना आपल्या संघटित कृतीने आपला काही प्रभाव पाडता येतो त्यांना अल्प प्रमाणात का होईना, यश पदरात पाडता येते. याची उदाहरणे म्हणजे मुंबईतील गुमास्ते, हॉटेल कामगार, माथाडी कामगार, छोट्या छोट्या प्रिंटिंग प्रेसमध्ये काम करणारे कामगार. पण इतरांना तेही जमत नाही, याचे उत्कृष्ट उदाहरण द्यावयाचे झाल्यास विडी कामगार, यंत्र–माग कामगार वगैरेंचा उल्लेख करता येईल.

## अस्तित्वात असलेल्या कायद्यांचीही अमलबजावणी नाही

दुर्बल वा असंघटित असलेल्या कामगारांना लागू असणाऱ्या कायद्यांना काही तोटा नाही. औद्योगिक तंटे सोडविण्यासाठी यंत्रणा पुरवणारा औद्योगिक विवाद कायदा, दहापेक्षा जास्त कामगार काम करीत असलेल्यांना लागू असणारा ग्रॅच्युइटी कायदा, दुकाने व संस्थांसाठी असलेला व कामगारांना कामाच्या ठिकाणी किमान सोयी उपलब्ध असाव्यात म्हणून झालेला शॉप्स व एस्टॅब्लिशमेंटस् कायदा, वेतन वगैरे बुडविले गेल्यास वसुलीसाठी पेमेंट ऑफ वेजीस कायदा वगैरे प्रकारचे कायदे आहेत. महाराष्ट्रात सुमारे ४५ धंद्यांतील कामगारांना किमान वेतन कायदा लागू आहे. शेतमजुरांनाही किमान वेतन लागू केले आहे, त्यात सुधारणा व्हावी म्हणून नव्याने एक समितीही नेमली गेली आहे. किमान वेतनासारखा कायदा हा असंघटितांना कायद्याप्रमाणे ठरलेल्या न्यूनतम वेतनाची शाश्वती मिळावी, म्हणून केलेला कायदा आहे. संघटित कामगार चळवळीने दुर्बलातल्या दुर्बलाला किमान काही आधार असावा म्हणून केलेल्या प्रयत्नामुळे यापैकी बरेचसे कायदे झाले आहेत वा पूर्वीच अस्तित्वात असलेल्या कायद्यात सुधारणा झाली आहे. या कायद्यांच्या अमलबजावणीच्या दृष्टीने घोर निराशा आहे. या कायद्यांच्या अंमलबजावणीसाठी असलेली शासकीय यंत्रणा फार अपुरी आहे जी काही आहे ती काही प्रमाणात लाचलुचपतीने ग्रासलेली आहे, काही प्रमाणात स्थानिक वरिष्ठ आणि बलिष्ठ व्यक्तींच्या दबावाखाली आहे. यंत्रणेतील ज्या अधिकाऱ्यांना निःस्पृहपणे काम करण्याची उमेद आहे त्यांनाही अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. कायद्याप्रमाणे ठरलेले न्यूनतम वेतन हे अनेक धंद्यांच्या बाबतीत अतिशय असमाधानकारक असूनही त्याचीही अमलबजावणी होत नाही, ही वस्तुस्थिती आहे. असंघटित कामगारांच्या बाबतीत मुंबईसारखे शहरही याला अपवाद नाही. मुंबईमध्ये असलेल्या अनेक औद्योगिक वसाहतींत छोट्या छोट्या कारखान्यांत हे सगळे कायदे पायतळी तुडवले जात आहेत. कायद्याप्रमाणे कारखान्यात कामगारांच्या प्रकृती स्वास्थ्याच्या दृष्टीने पाळावयाचे नियम, कामाच्या तासांच्या व जादा कामाच्या वेतनाच्या बाबतीत पाळावयाचे नियम, किमान वेतनाच्या बाबतीत पाळावयाचे निर्बंध वगैरे काही पाळले जात नाही आणि या बाबतीत जर कुणी हालचाल केली तर संबंधित कामगारांना डिच्चू दिला जातो आणि कायदा व यंत्रणा यासंबंधी बेफिकीर असलेल्या मालकांच्याबाबत शासन काही करू शकत नाही आणि जिथे शासन यंत्रणेकडून अल्प प्रयत्न होतो तिथेही इतका विलंब लागतो की, त्यामुळे संबंधित कामगार हवालदिल होतात आणि हतबल ठरतात. मुंबईसारख्या शहरात असंघटित कामगारांची ही स्थिती, तर इतरत्र काय असेल, याची आपण कल्पना करू शकतो. मुंबईत काम करणाऱ्या मिल मजदूर सभेच्या संशोधन व विकास विभागातर्फे त्या विभागाच्या संचालक डॉ श्रीमती शांता वैद्य यांनी इचलकरंजी येथील यंत्रमागावर काम करणाऱ्या कामगारांच्या परिस्थितीबाबत पाहाणी करून काढलेले निष्कर्ष गेल्या वर्षी पुस्तक रूपाने प्रसिद्ध केले आहेत. तिथे कामगारांची परिस्थिती किती शोचनीय आहे व सर्रासपणे कायद्याचेही उल्लंघन कसे होत आहे, याची माहिती मिळते.

## असंघटितांना संघटित करण्यात अडचणी

मुंबईसारख्या शहरातही छोट्या छोट्या कारखान्यातून काम करीत असलेल्या कामगारांना संघटित करण्याचा प्रयत्न केला आणि काही हालचाल केली तर ते प्रयत्न कसे हाणून पाडले जातात याची अनेक मासलेवाईक उदाहरणे देता येतील. संबंधित कामगार हे आपले

कामगारच नाहीत, असे सांगितले जाते. तसे सिद्ध करण्यासाठी बनावट कागदपत्र सादर केले जातात. हजेरी व वेतन पत्रकेही नसतात. कायद्याप्रमाणे वेतन दिल्याचे खोट पुरावेही सादर केले जातात. एकाच गाळ्यात चालू असलेले एकाच प्रकारचे उत्पादन, पण तीन–चार निरनिराळ्या फर्म्सच्या नावांवर काम चालू. ज्याचा कामगारांनाही पत्ता नसतो. रातोरात फर्म्सच्या नावाची पाटी बदलली जाते आणि या सर्वांना तोंड देऊनही जर काही निर्णय हाती लागलाच तर त्याची अंमलबजावणी केली जात नाही. हतबलता येते. शासकीय यंत्रणा जिथं दारात उभी आहे, वाहतुकीची चांगली सोय आहे, संघटित शक्तीचा काही आधार आहे, अशा ठिकाणी जर ही अवस्था असेल तर जेथे या सर्वांचा अभाव आहे त्या ठिकाणी काय परिस्थिती असेल ? हे आपण तर्काने जाणू शकतो.

असंघटितांना संघटित करण्यात अनेक प्रकारच्या अडचणी आहेत. हा दुर्बल कामगार परिस्थितीच्या दबावाखाली वावरत असतो. ज्या मालकाकडे तो काम करतो त्याचा दबाव, कौटुंबिक स्थितीचा दबाव, ग्रामीण व नागरी भागात सरकारी अधिकारी व प्रतिष्ठित समजली जाणारी मंडळी यांचा दबाव–अशा प्रकारच्या स्थितीमुळे तो दबलेला असतो. आपल्या मालकाकडून वेळीअवेळी घेतलेल्या कर्जाच्या ओझ्याखालीही तो असतो. त्यामुळे एक प्रकारची लाचारीही निर्माण झालेली असते. अनेक ठिकाणी तो आपल्या वरिष्ठांच्या नात्यागोत्यातीलही असतो. संघटित होण्याचा आपण प्रयत्न केला तर आपल्यावर अधिक संकटे कोसळतील, अशी साधार भीती त्याला मनातून वाटत असते. म्हणून संघटना उभारण्याचा प्रयत्न झाला तरी तो दबकत दबकतच वावरत असतो, निर्धाराने पुढं येवू शकत नाही. कायद्याने आधार दिलेला असला तरी शासन-यंत्रणा आपणास न्याय देवू शकणार नाही, असे त्याला वाटत असते. अशा अनेक कारणांमुळे त्याला संघटित करण्यासाठी होणाऱ्या प्रयत्नांना त्याच्याकडून पुरेसा प्रतिसादही मिळत नाही. आणि अशा या परिस्थितीत त्याला संघटित करण्याचा प्रयत्न करणारेही थकतात.

**औद्योगिक कामगारांत कमाल व किमान उत्पन्नातील वाढलेली तफावत**

आज याचा परिणाम असा झाला आहे की, मोठमोठाले कारखाने वा संस्था यांतील संघटित झालेले कामगार आपल्या संघटित शक्तीच्या जोरावर आपल्या परिस्थितीत सुधारणा करू शकले आहेत, आणखी करीत आहेत. पण, हा असंघटित कामगार मागे पडत चालला आहे, आणखी पडत आहे त्याची दारिद्र्यावस्था दिवसेंदिवस शोचनीय बनत चालली आहे ग्रामीण भागातील कर्मचाऱ्यांची परिस्थिती तर भयावह आहे. मोक्याच्या ठिकाणी असलेला कामगार आणि असंघटित कामगार यांच्या उत्पन्नातील तफावत दिवसेंदिवस वाढत चालली आहे. द्रुतगतीने वाढणारी महागाई, अगणित बेकारी, आणि सरासरी जीवनमानाची खालची पातळी या संदर्भात ही वाढती तफावत चिंतेची बाब झाली आहे.

## आंदोलनाचाच मार्ग

परिस्थितीने लाचार म्हणून संघटित नाही, संघटित नाही म्हणून आपली परिस्थिती सुधारण्यासाठी काही दबाव नाही, आणि दबाव नाही, म्हणून अस्तित्वात असलेल्या कायदेकानूंचाही काही आधार मिळत नाही, अशी ही अवस्था आहे. अशा या असंघटित कामगारांच्या मनातील भीती व लाचारी कशी दूर करावी, हा खरा प्रश्न आहे. नेहमीच्या चाकोरीत आणि रूढ नीतिनियमांत हे काम साधणारे नाही. व्यवहारी बुद्धीने, काटेकोर विचार करून ही अवस्था दूर होणारी नाही. असंघटितांना संघटित करण्याचे त्याचे प्रश्न धसास लावण्याचे काही ठिकाणी तुरळक प्रयत्न चालू आहेत. पण समस्येचे एकूण स्वरूप लक्षात घेता ते फारच अपुरे आहेत, परिणामकारक नाहीत. दबलेल्या कामगाराची मानसिक बैठक तयार करण्यासाठी सामाजिक व आर्थिक परिवर्तनाचा ठोस कार्यक्रम घेवून निदान महाराष्ट्रात तरी आंदोलन उभारण्याच्या दिशेने प्रयत्न होणे जरूर आहे. इथे छोट्या मोठ्या हितसंबंधांना तडे जाणार आहेत, त्यातून निर्माण होणाऱ्या आघातांना पेलण्याची तयारी होणे आवश्यक आहे. आजचे राजकारण, समाजकारण व अर्थकारण ज्या चौकटीत चालले आहे, त्या चौकटीत हे होऊ शकेल का ?

एकच उदाहरण घेवू. साऱ्या महाराष्ट्राला लागू होईल असे किमान वेतन ठरवले जावे. ते कुठल्याही क्षेत्रातील कर्मचाऱ्याला लागू व्हावे, ते कर्मचारी व त्याच्या कुटुंबियांच्या किमान गरजा भागवणारे असावे व त्याची काटेकोरपणे अमलबजावणी व्हावी, अशी समजा मागणी आहे. अशी मागणी वास्तविक संघटित कामगार चळवळीच्याही व्यासपीठावरून अनेक वेळा केली गेली आहे. कारण इतर कुठल्याही क्षेत्रात नसली तरी महाराष्ट्रात एका क्षेत्रात समानता आहे. महागाई सर्वत्र सारखी आहे. मग तो शहरी भाग असो, निम–शहरी असो वा ग्रामीण असो. म्हणून मागणी रास्त आहे. पण कायद्यानं न्यूनतम वेतन ठरवतानाही राज्याचे तीन–चार विभाग पाडले जातात. ग्रामीण भागात कारखाने जातात तेव्हा नफा वाढवण्यासाठी वेतनावर होणारा खर्च कमीत कमी व्हावा, या इराद्याने. पण या वास्तव मागणीचाही पाठपुरावा करायचे म्हटले तरी आजच्या समाजाचे तथाकथित आधार असलेले व स्वतःला पुरोगामी म्हणवणारे अनेक त्यास कसून विरोध करणार आहेत. मोठाल्या कारखान्यात काम करणारा कामगार आपल्या गावच्या शेतावरील मजुराला कमीत कमी वेतन मिळावं म्हणून धडपडत असतो. पण कारखान्यात आपल्या वेतनात सुखसोई व वेतन वाढत राहावे म्हणून आंदोलन करत असतो. समान किमान वेतनाच्या मागणीत येणारे हे असे अडथळे तर जीवनावश्यक इतर गरजांच्या मागण्यांबाबत कसे अडथळे येतील आणि कुणाकडून येतील त्याची कल्पना करता येते.

## स्वयंकेंद्रित वृत्ती व फुटीर प्रवृत्ती

कामगार चळवळीचे बरेचसे लक्ष हे संघटित उद्योगधंद्यांतील कामगारांवर केंद्रित झाले आहे. कारण या चळवळीवर संघटित व मोक्याच्या ठिकाणी असलेल्या उद्योगधंद्यांतील मोठ-मोठाल्या संघटनांचा व त्यांच्या नेत्यांचा प्रभाव आहे चळवळीचे नेतृत्व करणारे नेते हे या अशा संघटनांतीलच आहेत. त्यांना आपल्या संघटनांकडेच बहुतांशी लक्ष पुरवावे लागते. देशातील एकूण वातावरणाचा परिणाम या मोठमोठ्या संघटना स्वयंकेंद्रित बनण्यात झाला आहे. त्यामुळं जी आंदोलने केली जातात ती बहुतांशी संघटित

कामगारांच्या प्रश्नांसाठी, ज्यांनी काही कमावले आहे, त्यांना जास्त मिळावे म्हणून. या आंदोलनाला ओघाओघाने कमजोर व असंघटित कामगारांसाठी जे काही साधता येईल ते साधण्याचा फक्त प्रयत्न होतो. शिवाय संघटित कामगारांतही जिथे फुटीर प्रवृत्ती आहेत तिथे असंघटितांसाठी जे काही थोडे चालले आहे तिथेही या फुटीर प्रवृत्तींची तीव्र झळ लागतेच आहे. इचलकरंजीत सुमारे ३०,००० यंत्रमाग आहेत. एकूण कामगारांपैकी मात्र २० टक्केही संघटित नाहीत आणि अशा परिस्थितीत तेथे सात यूनियन्स काम करीत आहेत. यूनियनशी संबंध ठेवण्यास जिथे अनेकांना भीती वाटते तिथे हे असे चित्र आहे. हेच चित्र इतर केंद्रांतही आढळते. त्या त्या केंद्रातील कामगार संघटनांनी तत्काळ एक व्हावं म्हणजे दबलेल्या, हतबल अशा या कामगारांची शक्ती वाढेल, हे खरं आणि आवश्यक असले तरी ते आजच्या वातावरणात प्रत्यक्षात येणे फार कठीण आहे. मग असा उपाय सुचवावासा वाटतो की, अशा या ठिकठिकाणच्या केंद्रात विखुरलेल्या कामगार संघटनांनी त्या त्या केंद्रात काही किमान कार्यक्रमावर आघाडी निर्माण करून संघटितपणे पाउले टाकणे आवश्यक आहे. असे प्रयत्न अधूनमधून होताहेत, पण ते तुरळक व तात्पुरते असतात. असे जोरकस आणि स्थायी स्वरूपाचे प्रयत्न हे स्थानिक नेतृत्वाकडून होणे आवश्यक आहे, पण जसे आपले राजकारण व्यक्तिनिष्ठ आहे, तशी कामगार चळवळही व्यक्तिनिष्ठ आहे. स्थानिक कार्यकर्त्यांना प्रशिक्षित करण्याचे काम संघटित कामगार चळवळ करू शकेल, पण आपल्या नेत्यांकडे डोळे लावून बसण्याऐवजी निरनिराळ्या केंद्रात आघाडचा निर्माण करून आंदोलनं उभारण्याचे काम आपापल्या कुवतीप्रमाणे स्थानिक नेतृत्वानेच केले पाहिजे. मुंबईसारख्या शहरात नेत्यांनी निदर्शनांचे आणि बंदचे निर्णय घ्यावयाचे आणि साऱ्या महाराष्ट्राचे निर्णय म्हणून ठिकठिकाणच्या केंद्रांनी ते पाळावयाचे, अशाने कमजोर व असंघटित कामगारांचे प्रश्न सुधारण्याच्या दृष्टीने काही मदत होऊ शकत नाही.

### जिल्हानिहाय आंदोलनाची आवश्यकता

महाराष्ट्राच्या जिल्ह्या जिल्ह्यातून ठिकठिकाणी काम करीत असलेल्या कामगार व त्यांच्या बाजूने उभे राहू शकणाऱ्या संघटकांनी एकत्र येऊन जर सामूहिकपणे काही ठोस कार्यक्रम अंमलात आणायचे ठरवले व त्यावर आधारित आंदोलन उभारणे शक्य झाले तर आजच्या कमजोर व असंघटित कामगारांच्या प्रश्नांना हात घालता येईल. ही एक प्रक्रिया आहे, काही जिल्हा केंद्रांत तिने मूळ धरले तर ती जोरात सुरू होईल. संघटित कामगारांना या आंदोलनास सहाय्य करता येईल. जिल्ह्या जिल्ह्यात जसे वातावरण तयार होईल तसे स्थानिक पातळीवरही सहाय्य मिळेल, तिथेही उभारला जाऊ शकेल. तेव्हा असहाय्य, दुर्बल अशांना न्याय, किमान आधार प्राप्त व्हावा म्हणून आघाडीत सामील झालेल्या संघटना आणि स्थानिक नेतृत्व सत्तेच्या राजकारणापासून दूर राहाण्याची तयारी दाखवतील, तेव्हाच हे साध्य होईल.

◎ ◎

# शेतकरी शेतमजूर

**गोविंद का. शिंदे**

महाराष्ट्रात श्री. शरद जोशींनी जे शेतकरी आंदोलन उभारलं त्यामुळे शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे साऱ्या देशाचे लक्ष गेले. शेतमालाच्या भावासाठी का होईना पण शेतकरी वर्ग संघटित झाला. कांद्यापासून सुरवात करून दुधापर्यंतचे भाव वाढवून मिळावेत म्हणून आंदोलकांनी मागणी केली व सरकारला भाव वाढवून द्यावे लागले त्यामुळे शेतकऱ्यांचा फायदा झाला. त्यांना लाखो रुपये मिळाले. गोव्यात सर्व सेवा संघाचे अधिवेशन गेल्या वर्षी झाले तेथे श्री शरद जोशी आले होते. आल्याबरोबर ते म्हणाले : या आंदोलनामुळे शेतकऱ्यांना जे पैसे मिळत आहेत त्यांचे शेतकरी काय करील? दारूसारख्या व्यसनात हा पैसा उधळील अशी भीती वाटते. आपल्याला मिळालेल्या पैशाचे शेतकरी काय करत आहे हा संशोधनाचा विषय आहे. परंतु यातला बराच पैसा शेतमजुराला मिळाला पाहिजे होता, तसं झालं नाही हे मात्र स्पष्ट आहे.

श्री शरद जोशींनी शेतमालाचे भाव वाढवून देण्यासाठी जे आंदोलन सुरू केलं त्याला शेतमजुरांनीही साथ दिली पाहिजे, असे श्री शरद जोशींचे म्हणणे होते. त्यावेळी त्यांना विचारण्यात आले होते : शेतमजुरांचा यांत काय लाभ? तेव्हा शरद जोशी म्हणाले होते की, शेतमजुराला मजुरी वाढली पाहिजे. शेतमजुराला रोज किमान वीस रुपये तरी मजुरी मिळायला हवी. तसं झालं नाही तर मी त्यासाठी लढेन. आता शेतकऱ्यांच्या मालाला भाव वाढवून मिळाले आहेत, मजुरांची मजुरी वाढली आहे का? साधं सरकारने ठरवून दिलेले जुने किमान वेतन देखील शेतमजुरांना अनेक ठिकाणी मिळत नाही. तुम्हाला पैसा मिळाला ना? फायदा झाला ना? मग शेतमजुराला त्यातला किती दिला? शेती करतो शेतमजूर, रात्रंदिवस उन्हापावसात त्याला शेतात राबावं लागतं म्हणून शेती पिकते, परंतु वाढवून मिळालेल्या भावातून त्यांना काही मिळत नाही अशी आज स्थिती आहे. का व्हावं त्यानं शेतकऱ्यांच्या आंदोलनात सामील? केव्हा लढवणार शेतमजुरांचा लढा श्री शरद जोशी? ही कोंडी फुटली नाही तर शेतकऱ्यांचे आंदोलन यशस्वी होणार नाही. शेतमजूर हा शेती उत्पादनाचा कणा आहे. त्याला या आंदोलनाच्या लाभापासून वंचित केलं तर त्याचा सहभाग आंदोलनाला मिळणार नाही. शेतमालाचे भाव व शेती उद्योगासंबंधीचे प्रश्न शेतकरी व शेतमजूर एकत्र आले, एकजुटीने लढले तरच सुटू शकतील.

महाराष्ट्रातला गरीब शेतकरी, भूमिहीन शेतमजूर अत्यंत गांजलेला आहे. आणि दारिद्र्यरेषेखालचे जीवन जगत आहे. १९७४ साली महाराष्ट्र सरकारने शेतमजुरांसाठी किमान वेतन जाहीर केले. त्यामुळे स्त्री-पुरुष शेतमजुराला तीन रुपये किमान वेतन मिळू लागलं. सात तास कामाचे तीन रुपये. पुढे १९७८

साली हे किमान वेतन सुधारलं व चार रुपये केलं. तेच अजूनपर्यंत चालू आहे. पुन्हा सरकारने समिती नेमली आहे. अजून तो विचार करत आहे. आजच्या महागाईच्या काळात चार रुपये म्हणजे गरिबांची क्रूर थट्टा आहे. हे चार रुपयेही बहुतेक ठिकाणी मिळत नाहीत. कोरडवाहू भागात तर मुळीच मिळत नाहीत. स्त्री–मजुरांना तर यापेक्षा कमी वेतन दिले जाते. जेथे शेतमजूर संघटित आहे तेथे तो हे चार रुपये मिळवण्यासाठी धडपडत असतो. शेतमजूर किमान वेतनाचा कायदा झाला परंतु त्याच्या अंमलबजावणीची व्यवस्था सरकारने केली नाही. दर तालुका, त्याचा विभाग–येथे या कायद्याची अंमलबजावणी होईल अशी यंत्रणा पाहिजे ती अजून नाही. त्यामुळे कायदा होवून तो पुस्तकात राहिला आहे, अशी आजची स्थिती आहे. शेतमजुरांना वर्षभर शेतीत कामच नसतं. त्यामुळे शेतीच्या हंगामाव्यतिरिक्त त्याला बेकार राहावं लागतं. शेतमजुराला सरासरी वर्षाला दीडशे दिवसच काम मिळू शकतं. ज्यांना रोजगार पाहिजे अशांची संख्या ग्रामीण भागात प्रचंड आहे. रोजगार हमीचं काम सर्वत्र काढलं जात नाही तरी काही भागात निघतं. त्या कामावर मजुरांची संख्या प्रचंड असते. सर्व शेतमजुरांना काम कसं द्यायचं, ज्यामुळे तो आपला उदरनिर्वाह करील व मानाचं जीवन जगू शकेल? हा मुख्य प्रश्न आज देशापुढं आहे.

शेतमजुरांचा इतिहास पाहिला तर आपल्या देशात १८४० साली जी शिरगणती झाली त्या वेळी अहवालात म्हटलं आहे की देशात कोणीही भूमिहीन नाही. याचा अर्थ असा होतो की त्या वेळी सर्वांना जमीन होती व शेती करून सर्व लोक आपले पोट भरत होते. पुढे अठराश सालच्या अखेरीला भारतात ऐंशी लाख शेतमजूर झाले होते. १९६१ साली तीन कोटी चौदा लक्ष शेतमजूर असल्याचे सांगितले गेले. १९७१ साली शेतमजुरांची संख्या पाच कोटी झाली. सध्या शेतमजुरांची संख्या दहा कोटींच्या घरात पोचली आहे व दरवर्षी ही संख्या वाढत आहे. यांना काम कसं द्यायचं, हा प्रश्न आहे.

शेतमजुरात स्त्रिया, मुले, दलित व आदिवासींचे प्रमाण फार आहे. या सर्वांना तीन प्रकारे काम करावं लागतं. रोज-मजुरीचे काम, सालदार पद्धतीचे काम व कंत्राट पद्धतीचे काम. शेतमजुरीचे जो काम करतो त्याचे जीवन फार अस्थिर असते. त्याला फक्त हंगामातच काम मिळतं व कामासाठी त्याला भटकावंही लागतं. सालदार हा बांधील मजूरच असतो. मालकाकडेच त्याच्या शेतीवर झोपडी बांधून त्याला राहावं लागतं व रात्रंदिवस त्याला काम करावं लागतं. पहाटे चार वाजल्यापासून तो रात्री ११ वाजेपर्यंत तो कामातच असतो. घरची व शेतातील सर्व प्रकारची कामे तो करतो. त्याला लग्नासाठी किंवा घरच्या अडचणीसाठी पैसे दिले जातात व ते पैसे आणि त्याचे व्याज वाढतच जाते. शेवटी, हा जन्मभर काम करतच राहातो. कंत्राटी काम प्रामुख्याने कापणीचे असते. एक एकर शेत कापून दिले तर एक ते अडीच मण धान्य दिले जाते. मद्रासमध्ये हे प्रमाण उत्पन्नावर आहे. त्या एकरात जे धान्य उत्पादन होईल त्याचा चौथा हिस्सा मजुरी म्हणून मिळायचा. या कंत्राटात कधी पैसे मिळतात तर कधी नुकसान होवून फार कमी मजुरी पडते.

शेतमजुरांची समस्या ही देशापुढची मोठी समस्या आहे, दिवसेंदिवस ती वाढत जाणार आहे. शेतमजुरांच्या संख्येत भरमसाठ वाढ होत आहे. त्यांना कामाची शाश्वती नाही. शेतमजुरांत स्त्रियांचा भरणा मोठा आहे. पोटासाठी ओल्या बाळंतिणीला कामावर जावं लागतं. उन्हा-पावसात तिला तशाही परिस्थितीत काम करावं लागतं. तिच्या बाळंतपणाच्या पगारी सुट्टीची आज कल्पनाच करता येत नाही. शहरातल्या स्त्री मजुरांना बाळंतपणाची पगारी हक्काची रजा, महिन्याची व वर्षाची किरकोळ रजा, आजारपणाची रजा, प्रॉव्हिडंट फंड, ग्रॅच्युइटी आदी सवलती मिळतात. खेड्यात राबणाऱ्या शेतमजुरालाही या सर्व सोई–सवलती मिळाल्या पाहिजेत. रोज सात तास काम, परंतु जास्त काम केलं तर त्याला इतर कामगाराप्रमाणे ओव्हर टाईम मिळाला पाहिजे. इतर सोई–सवलती मिळायला हव्यात. याबाबत इतर कामगार व शेतमजूर यांत फरक होता कामा नये. शेतमजुरांची अशी कायदेशीर व्यवस्था व्हायला हवी. महाराष्ट्रात आता शेतमजुरांसाठी नवीन किमान वेतन ठरणार आहे. त्यासाठी समिती नेमण्यात आली आहे. ज्या सरकारने शेतकऱ्यांचे सर्व कर्ज माफ केलं ते सरकार शेतमजुरांचे किमान वेतन ठरवताना काय करतं ते पहायचे आहे. सरकारची परीक्षाच होऊन जाणार आहे. कोणत्याही परिस्थितीत शेतमजुराला रोज दहा रुपये मजुरी मिळालीच पाहिजे. शिवाय त्याला इतर मजुरांप्रमाणे सोई–सवलती मिळाल्या पाहिजेत. त्याला माणसकीने वागवलं गेलं पाहिजे. मानाने त्याला जगता आलं पाहिजे.

शेतमजुरांचे नुसते किमान वेतन वाढवून त्यांचा प्रश्न सुटेल असं नाही. त्यांना कायमचे काम मिळेल अशी व्यवस्था व्हायला हवी. रोजगाराची हमी त्याला मिळाली पाहिजे. जो मनुष्य जन्माला येतो त्याला जगण्याचा हक्क आहे. त्याला जीवन चालवण्याचे साधन उपलब्ध असलं पाहिजे–म्हणजे त्याला सतत काम मिळालं पाहिजे. सरकार काम देवू शकत नसेल तर त्याला रोज पाच रुपयाचे हिशोबाने बेकार भत्ता मिळाला पाहिजे. त्याला गावातच काम मिळालं पाहिजे. यासाठी गावची आजची रचना बदलावी लागेल. जमिनीचे समान वितरण करावं लागेल. शेतीला पाण्याची सोय करावी लागेल. गावात शेतीवर सर्वांना काम मिळणार नाही हे लक्षात घेऊन गावात छोट्या उद्योगधंद्यांची उभारणी करावी लागेल. लोकांच्या जीवनोपयोगी गरजा आहेत त्या गावातच भागतील अशी योजना व्हायला हवी. खत, दूध, तेल व कापड हे गावातच तयार होऊ लागलं तर अनेकांना रोजगार मिळू शकतो. जंगल भागात जंगलाचा उद्योग वाढवून सर्वांना काम देता येणे शक्य आहे. शेतमजुरांचा प्रश्न सोडवताना या दिशेने पुढे जायला हवे.

◎ ◎

---

## सहवेदना

बुटीबोरीजवळच्या तुरकमारी (मारकम) गावातील सेवादल सैनिक कुमार चंद्रभान गोतम (१९) याचे दि. १२ एप्रिलला निधन झाले. टॅंकची धडक त्याला बसली. राष्ट्र सेवा दलाची शाखा फुलवीत असतानाच अत्यंत लहान वयात दुर्दैवी अपघातास तो बळी पडला. त्याचे कुटुंबीय व सह–कार्यकर्त्यांच्या दुःखात सर्व साधना परिवाराची सहवेदना.

◎ ◎

# रोजंदारी श्रमिक– खरोखर वेठबिगारीच !

**डॉ. बाबा आढाव**

महाराष्ट्र राज्यातील किंबहुना सर्व भारतातील बहुसंख्य कामगार असुरक्षित आहेत. हे विधान पटकन मान्य होणार नाही, परंतु ते कठोर वास्तव आहे. कामगार म्हटले की, एक विशिष्ट प्रतिमा निर्माण होते. औद्योगिक कारखान्यांत काम करणारे, सरकारी–निमसरकारी सहकारी संस्थांत काम करणारे, विमा–बँका आदी व्यवसायांत नोकऱ्या करणारे असे कामगार-कर्मचारी आपल्या डोळ्यांपुढे येतात, परंतु या वर्गाची संख्या फार मर्यादित आहे. शॉप्स ॲन्ड एस्टॅब्लिशमेंटस् ॲक्ट, मिनीमम वेजेस् ॲक्ट, पेमेन्ट ऑफ वेजेस ॲक्ट, इंडस्ट्रिअल डिसप्युटस ॲक्ट, अनफेअर लेबर प्रॅक्टिसेस ॲक्ट इ. सर्वसामान्य कायद्यांचे संरक्षण वरील वर्गाला मिळते. त्याचबरोबर काही विशिष्ट कायदेही केले जातात. कामगार वर्गाने चालवलेल्या चळवळीचे ते यश आहे.

या कामगारांचे सर्व प्रश्न सुटले आहेत, असे मला म्हणावयाचे नाही. कामगार वर्गाने वेळोवेळी केलेल्या चळवळीतून हे हक्क त्यांना मिळाले आहेत. एरव्ही आठ तासांचा दिवस, आठवडयाची पगारी सुट्टी, किरकोळ रजा इ. नियम झाले नसते. १८९२ साली मुंबईत मिलहॅन्ड ओनर्स असोसिएशन ही संघटना स्थापन झाली. या संघटनेने केलेल्या चळवळीमुळे त्यावेळेच्या ब्रिटिश सरकारने लेबर कमिशन नेमले. म. जोतीराव फुल्यांचे सहकारी श्री नारायणराव मेघाजी लोखंडे या कमिशनचे सदस्य होते. या कमिशनने वरील शिफारशी केल्या व त्या शासनाने अमलात आणल्या. मुंबईच्या औद्योगिकीकरणाबरोबर व राजकीय सत्तेच्या विकेंद्रीकरणाबरोबर कामगार चळवळीची वाटचाल सुरू झाली. गेल्या ९० वर्षांत कितीतरी घटना घडलेल्या आहेत.

मुख्यत: शासकीय–निमशासकीय कर्मचारी व औद्योगिक कामगार वर्गाच्या हिताचा विचार होणे स्वाभाविक होते. कारण उत्पादन-व्यवस्थेशी त्या वर्गाचे नाते स्पष्ट असतेच. संघटित-सामुदायिक चळवळीच्या मार्फत सौदा करण्याची त्यांची ताकद वापरण्याची संधी त्यांना मिळू शकते. 'हायर ॲन्ड फायर' चे अधिकार मालकांना असतात, तद्वतच 'संप करण्याचा कामगारांना' हक्क आहे हे भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने मान्य केलेले आहे. या कामगाराचे सर्व प्रश्न आता सुटले आहेत असे मला म्हणावयाचे नाही. औद्योगिक कामगार कायद्यांतील अनेक उणिवा, पळवाटा दाखवता येतील. तो स्वतंत्र विषय आहे. उदाहरणादाखल सांगावयाचे झाल्यास, किमान २० कामगार, हजेरी पटावर असल्याशिवाय प्रॉव्हिडंट फंडाची योजना लागू शकत नाही व किमान १० कामगार असल्याशिवाय बोनस मिळत नाही. संघटित मालकवर्ग राजकीय सत्तेवर दबाव आणून सरकारला गप्प बसवतात व तरतुदींना हरताळ फासतात किंवा हव्या त्या तरतुदी करून घेतात सूर्यास्तानंतर स्त्रियांना कामावर ठेवता येणार नाही ही तरतूद वगळण्यात आली असून ती वेळ आता रात्री ८॥ ची करण्यात आली आहे. पुणे-मुंबई शहरांतील कारखाने-दुकानांतून फारशी तक्रार होणार नाही. निपाणी-जयसिंगपूर सारख्या छोटया शहरांतील तंबाखू कामगार स्त्रियांची स्थिती काय होईल ? याचा विचार नवीन तरतूद करताना झाला नाही.

'समान काम-समान दाम' ही घोषणा तोंडावर फेकली जाण्याची शक्यता आहेच. हे सर्व मान्य करूनही माझा मुद्दा शिल्लक उरतो. कामगार हक्काची चळवळ अद्यापि फार मर्यादित राहिली आहे. कष्ट करून पोट भरणाऱ्या कामगारांचा भला मोठा वर्ग अद्याप असुरक्षित राहिला आहे. त्याच्या वाटचाला एकही हक्क आलेला नाही. त्याला दाद मागता येत नाही. फिर्याद गुदरता येत नाही. वेठबिगाराच्या अवस्थेतच त्याला जीवन कंठावे लागत आहे.

१९८१ जुलै महिन्यात पुण्यात असुरक्षित कामगार परिषद संघटित करण्यात आली होती. त्यावेळी केलेल्या पाहणीत असे लक्षात आले की एकटया पुणे शहरात असे दीड लाख कामगार आहेत. व्यापारीपेठा, शेतीमाल बाजार समित्या, मालवाहातुकीच्या गाडया, रेल्वे मालधक्के प्लॅटफॉर्म्स, एस टी ची स्थानके, सरकारी–निमसरकारी संस्थांची गुदामे इ. ठिकाणी मालाची चढउतार, वाहातूक करणारे हमाल व तोलार, बांधकाम क्षेत्रातील गवंडी, सुतार, पलॅबर्स व इतर मजूर, वीटभट्टयांवर काम करणारे, नदीच्या पात्रांतील वाळू काढणारे व लॉरीबरोबर वाहून नेणारे, दगडाच्या खाणीतून काम करणारे–असे हजारो कामगार आहेत. शहरांतील छोटया–मोठया फर्निचर, विडी, साबण, ओतकाम कारखान्यांतून 'येथे कामगाराला रोजच्यारोज वेतन दिले जाते' अशा पाटया भिंतीवर अडकवून मालकवर्ग बेगुमानपणे कामगारांना राबवून घेत असतो. पुण्याच्या आसपास मोठया औद्योगिक कारखान्यांची संख्या वेगाने वाढत आहे. या कारखान्यांतील जॉबवर्क मिळवून ते पूर्ण करून देणाऱ्याची वर्कशॉप्स्ची पिलावळ फार मोठी आहे. वर्कशॉप छोटे व मालक गरिबीतून वर आलेला म्हटले की समाजाची शासनकर्त्यांची सहानुभूती या मालकाकडे वळते. त्यामुळेच या छोटया मालकाला मोठे होण्याची संधी प्राप्त होते. त्याला वाटते आपल्या दैवाचा हा कौल आहे. मोठया कारखानदारांचे फावते ! उत्पादन–खर्चातील मजुरीच्या खर्चात राजरोस चोऱ्या करता येतात. छोटा कारखाना या नावाखाली कामगारांना कायद्याचे संरक्षण मिळत नाही, असा कामगारवर्ग धुणीभांडी, स्वयंपाकाची कामे करणाऱ्या मोलकरणी, व्यापारी क्षेत्रातील किरकोळ कामे करणारे व्यावसायिक, (उदा. कागद गोळा करणे, भंगार जमा करणे, डबा, बाटल्या, जुने कपडे, चिंध्या, फेरीवाले) सलून लॉन्ड्री इ. कामगार.................. असुरक्षित कामगारांची अशी यादी बरीच लांबवता येईल.

यांपैकी काही विशिष्ट व्यवसायासाठी शासनाने समित्या नेमल्या आहेत, फुटकळ शिफारशी अमलात आणण्याचा देखावा केला आहे.

ज्या कायद्यांना किंवा त्यामागील उद्देशांना जनमताचा पाठिंबा नसतो त्यांची 'हातभट्टी' झाल्याशिवाय राहात नाही. कायदा दारूबंदीचा आणि राज्य हातभट्टीचे ' अशी परिस्थिती निर्माण होते.

यापैकी हमाल कामगारांच्याबरोबर माझा गेल्या दोन तपांहून अधिक काळ संबंध आहे. हमालांच्या चळवळीतील अनेक घटना मला ज्ञात आहेत. शॉप्स् अँड एस्टॅब्लिशमेन्टस् कायद्यात १९५९ साली दुरुस्ती झाली आणि महाराष्ट्र शासनाने एका परिपत्रकाद्वारे जाहीर केले की, व्यापारी क्षेत्रातील हमालांना हा कायदा लागू नाही. व्यापारी वर्गाने संघटितरीत्या दबाव आणून ही घटना घडवली. त्यावेळी त्यांनी केलेल्या युक्तिवादानुसार व्यापारी व हमाल यांच्यांत मालक-मजूर नाते नाही. हमाली गिऱ्हाइकाकडून वसूल केली जाते व हमाल अनेक ठिकाणी काम करतो असे म्हणणे मांडले. शासनाने फारशी चौकशी केली नाही. व्यापाऱ्यांचा युक्तिवाद ग्राह्य धरला व परिपत्रक काढले, ' गिऱ्हाइकाकडून हमाली घेतली जाते ' या भूमिकेचा संघटित हमाल चळवळीला फायदा झाला. गिऱ्हाइकाकडून पाठीचा दाम वसूल करण्याचा हक्क त्याच्या लक्षात आला. आपल्या पाठीचे आपण मालक आहोत, ही भावना वाढीला लागली. एक प्रकारे व्यापाऱ्यांच्या बंधनातून हमाल मुक्त झाला. फुकट कामे बंद झाली. ' काम असेल तर दाम ' याबरोबरच ' दाम असेल तर काम ' हा प्रघात रूढ झाला. स्वतःच्या उपरेपणाला आपल्या संघटनेकडून तो उत्तर शोधू लागला. ही वाटचाल पुढे लांबलचक आहे. तिच्याबद्दल ' कोण माणसे, कोण जनावरे ' या पुस्तकात डॉ. अनिल अवचटांनी सविस्तर लिहिले आहे. हमालांची अस्मिता जागृत झाली परंतु कामाच्या पद्धतीत बदल करवून घेणे अवघड होऊ लागले. महाराष्ट्रात इतरत्रही चळवळी वाढल्या. मालक-मजूर नाते नसलेल्या या विभागासाठी काय करता येईल? याचा शासनाला विचार करणे भाग पडले. निरनिराळ्या समित्या नेमल्या गेल्या.

त्यातून माथाडी हमाल असुरक्षित कामगार कायदा (१९६९) तयार झाला. गेल्या १३ वर्षांत हा कायदा मुंबई शहराबाहेर धडपणे अंमलात येऊ शकलेला नाही. तो आणखी एक स्वतंत्र विषय आहे. असुरक्षित कामगारांना किती कटकटींना तोंड द्यावे लागते, याचा तो एक नमुना आहे. संघटित व्यापारी वर्ग सर्वोच्च न्यायालयापर्यंत या ना त्या मुद्यावर जाऊन एकसारखी ' स्थगिती ' मिळवीत आहे. पुणे-कोल्हापूर येथील माथाडी बोर्डाचा कारभार ठप्प आहे.

व्यापाऱ्यांच्या अर्जावर स्थगिती देणारी न्यायालये कामगारांच्या नुकसानीचा विचार करताना दिसत नाहीत. कारण या व्यवसायात नुकसान भरपाई मिळण्याची तरतूद नाही. गिऱ्हाइकाकडून वसुली करावयाची असल्याने स्थगितीच्या काळातील सौद्याची जबाबदारी व्यापाऱ्यांवर नसते. गिऱ्हाईक निघून गेलेले असते. अंतिम निकाल कामगारांच्या बाजूने लागूनही मधल्या काळातील वाढीव हमालीला मुकावे लागते.

पुण्यात १९७४ साली कायद्याची सुरुवात झाली. १२०० हमालांना संरक्षण मिळाले. व्यापारी सर्वोच्च न्यायालयात गेले. १९७४ ते १९८० अशी ६ वर्षे स्थगिती राहिली. अंतिम निकाल कामगारांच्या बाजूने झाला, पण ६ वर्षांचा फरक–व्यापाऱ्यांच्या खिशात गेला. आता परत एका वेगळ्याच मुद्यावर स्थगिती झाली आहे.

असुरक्षित कामगारांच्या चळवळी दडपून टाकणे पोलिसांना सहज शक्य असते. मालकवर्ग इंडस्ट्रियल कोर्टातून वा सिव्हिल कोर्टात तात्पुरती स्थगिती आणून ठेवतो. एका लॉरी मालकाने वेतनवाढीसाठी झगडणाऱ्या कामगाराविरुद्ध स्थगिती आणली. अंतिम निकाल कामगारांच्या बाजूचा झाला. कारण त्याला मालक-मजूर नाते स्पष्ट करता आले नाही-त्यामुळे औद्योगिक कलह कायद्याचे संरक्षण मिळणे अवघड झाले. या प्रकरणांत मालकाने केलेली निवेदने अभ्यसनीय आहेत. नगरच्या एका तेल मालकाने बाहेरच्या मालवाहतूक लॉरीबरोबर येणाऱ्या हमालांना आत येण्यास असाच मज्जाव केला आहे. औद्योगिक न्यायालयात हा मालक हरला. आता त्याने सिव्हिल कोर्टातून स्थगिती आणली आहे. अशी कितीतरी प्रकरणे आहेत. सुरुंगाच्या दारूमुळे विहीर खोदताना ठार झालेल्या वडारी कामगाराला एक कपर्दिकही नुकसानभरपाई मिळू शकत नाही, हे बऱ्याचजणांना ठाऊक नसते. एका सहकारी साखर कारखान्यात पोत्यांची थप्पी कोसळून एक हमाल जायबंदी झाला. दोन्ही पायांच्या हाडांचा चुरा झाला. एक पाय कसाबसा नीट झाला दुसरा पाय तोडावा लागला. आता हा हमाल पाठीवर ओझे कसे घेणार ? नुकसानभरपाईचा दावा लावला. कारखान्याच्या वकिलाने सांगितले: हमाली काम कंत्राटाने दिले आहे. कंत्राटदाराने नुकसानभरपाई द्यावी. कंत्राटदाराने कानांवर हात ठेवले. कामगाराजवळ लेखीपुरावा नव्हता–केवळ कारखान्यांत झालेल्या अपघाताबद्दल शेवटी काय मिळणार ? मानवी भूमिकेवर तडजोड स्वीकारावी लागली.

असुरक्षित कामगारांच्या विभागात अशा कंत्राटदारांचा सुळसुळाट आहे. बांधकाम क्षेत्रात, गवंडी, लेबर्स यांना फसवणारे अनेक कंत्राटदार आहेत. हे कंत्राटदार रातोरात कामगारांच्या टोळ्या पळवून नेतात. आम्ही एक प्रश्न मिटवला. कामगार कामावर रुजू झाले. परंतु दोन दिवसांत त्यांना पळवून नेले. मुस्लिम समाजातील तलाक प्रथेविरुद्ध बोलले जाते. असुरक्षित कामगार क्षेत्रात मालक-मजूर नात्यालाच संरक्षण नसल्याने मालकवर्ग ' तलाक ' द्यायला सज्ज असतो. पुण्याच्या परिषदेत मोलकरणींनी बरेच लावून धरले. त्यावेळच्या मजूरमंत्र्यांनी मोघम उत्तर दिले. नागपूरला कळले की, त्यांच्या घरांतूनच याला विरोध आहे. ' कामगार कायदा काय चुलीपर्यंत आणणार काय? ' असा सवाल निर्माण झाला असुरक्षित कामगारांना कायद्याचे पाठबळ नसल्याने, संघटित ताकदीचा वापर करणे अवघड होते. समाजही या विभागाकडे अवहेलनेने पाहतो.

' शारीरिक कष्ट ' करणारांना समाजात प्रतिष्ठा नसते. मुळात हा वर्ग गरीब. उत्पादन व्यवस्थेत अगदी बाजूला पडलेला. अशिक्षित असल्याने त्याची ' अडाणी, नांगरगट्टे ' म्हणून अवहेलना होते. शारीरिक कष्ट करणाराबद्दल समाजातल्या उच्चभ्रूंना काय वाटते याचा एक नमुनेदार अनुभव सांगावासा वाटतो: हमालांना दरमहा किती पैसे मिळावेत ? असा प्रश्न एकदा कृषी खात्यात उपस्थित झाला. मी ' किमान हजार रुपये ' असे म्हटल्याबरोबर समोरच्या साहेबी खुर्च्या जागेवर उडाल्या ! ' काय बोलता राव, आम्ही एवढे शिकूनही एवढा पगार मिळत नाही. ' असा गलगा सुरू झाला. मी म्हटले, ' मग असे करा तुम्ही नोकरीचे राजिनामे द्या व हमाली सुरू करा. ' देशी साहेबांची ही वृत्ती सनातन आहे. शिकलेली माणसे शारीरिक कष्टाला

तयार नसतात. आणि शारीरिक कष्टाच्या कामातही जातिव्यवस्थेने फारकती निर्माण केल्या आहेत. ड्रेनेज बिगारी म्हणून नोकरी स्वीकारणारा सवर्ण तरुण 'ड्रेनेज'ला हात लावायला तयार नसतो.

ग्रामीण शेतमजुरांचा प्रश्न मी येथे उपस्थित करीत नाही. त्यांचा अनुभव असाच आहे. 'पोटाला खायला घाला आन् काय पन काम करून घ्या.' असे दीनवाणे रडगाणे पदोपदी कानांवर पडते. दारिद्र्याने व बेकारीने ग्रासलेल्या समाजव्यवस्थेत कामगारांच्या या असहायतेचा फायदा धनिक वर्ग उठवित असतो.

भारतात मिश्र अर्थव्यवस्था आहे असे बोलले जाते. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत उत्पादन खर्च कमी करण्याच्या इराद्याने मजुरांचे शोषण केले जाते. अविकसित देशांत भांडवलसंचय व निर्मिती याच मार्गाने होणार असे घोकून सांगितले जाते. यातूनच पुढे मूठभर भांडवलदारांची जायदाद हिमालयाशी स्पर्धा करू लागते. तर कामगारांचे खरे वेतन प्रतिवर्षी ढासळत जाते. भारतीय भांडवलदारांनी, व्यापाऱ्यांच्या, कंत्राटदारांच्या, दलालांच्या मदतीने असुरक्षित कामगारवर्गाचे भयावह शोषण चालवले आहे. मजूर, सहकार व पुरवठा खात्यांच्या कक्षेत हा वर्ग येतो. परंतु आजच्या घटकेलाही पुरवठाखाते सरकारी गुदामांतून हमाली कामाची टेंडर्स जाहीर करते. खाजगी कंत्राटदारांची चंदी होते. क्वचित मजूर सोसायट्यांना काम दिले तर सहकार खाते दुसरी 'सवत' आणायला परवानगी देते. शेतीमाल बाजार समित्या सहकारी खात्याच्या कक्षेत असतात. या समित्यांवर नगरपालिका, बँकांचे, व्यापाऱ्यांचे, शेतकऱ्यांचे प्रतिनिधी आहेत.

परंतु हमाल-मापाड्यांना प्रतिनिधित्व नाही! मजूर खाते कायद्याला बांधलेले. अनेक मजूर अधिकारी सेवानिवृत्त झाल्याबरोबर मालकांच्या तैनातीला जातात, असुरक्षित कामगारांच्या संघटनांना मोठ्या जिकीरीने वाट काढावी लागते. पोलीस शांतता व सुव्यवस्थेच्या नावाखाली चॅप्टर केसेस घालतात. काहीही पत नसलेला व 'वट' नसलेला हा वर्ग. या वर्गाला 'औद्योगिक कामगार' वा सरकारी कर्मचारी म्हणून प्रतिष्ठा नाही; कामगार कायदे नाहीत. मेहनतीच्या कामांना सामाजिक प्रतिष्ठा नाही, संघटन नाही. अशा अवस्थेतही हा वर्ग परिवर्तनाची आकांक्षा बाळगून आहे. कामगार चळवळ या विभागात हलके हलके पसरत आहे. पुरोगामी मुखवटा धारण करणारे राज्यकर्ते तोंडाने कितीही आश्वासन देत असले तरी प्रत्यक्षात या वर्गाच्या हातात वाटाण्याच्या अक्षताच पडतात. तज्ज्ञांना अद्याप 'मालक मजूर खाते सिद्ध करण्याचा मार्ग सापडत नाही. त्यामुळे ते पुटपुटतात 'हाऊ टु जज? हाऊ टु इम्प्लिमेन्ट, इटस् जस्ट इम्पॉसिबल!' व्यापक कामगार चळवळीला या क्षेत्राची उपेक्षा करून भागणार नाही. ◎ ◎

---

## दुखवटा

कोल्हापुरातील एक प्रसिद्ध व्यापारी व समाजसेवक श्री हरिचंदभाई मेहता यांचा २२-४-८२ रोजी दुःखद देहान्त झाला. श्री हरिचंदभाई हो 'यत्न तो देव जाणावा' असे श्रद्धापूर्वक मानणारी व्यक्ती होती. आयुष्यात त्यांना किती व्यवसाय केले त्याची गणती नाही. परंतु ते करीत असता भारतातील वनौषधींकडे त्यांचे विशेष लक्ष असे. त्याचा प्रचार व्हावा म्हणून त्यांनी ग्रंथमालिकाही प्रसिद्ध केली. सदा यत्नशील हसतमुख, सदा दानी—असे हरिचंदभाई दिवंगत झाले याबद्दल 'साधना' परिवारातील सर्वांना दुःख होत आहे. ◎ ◎


# POONA CHAPTER OF COST ACCOUNTANTS

## College of Cost and Management Accountancy

Admission Office : 1195/4-B, Fergusson Road, Pune 411 005 Tel. : 58127

ANNOUNCES ITS

I C W A

Intermediate Oral Tuition Programme : Leading to Specialised Professional Qualification in cost Accountancy

JULY SEMESTER ADMISSIONS WILL OPEN ON 1st JUNE

ELIGIBILITY :-

Minimum 12th Std., F. Y., G. C D., Diploma in Engineering or Graduate ( Any faculty ) of any Recognised University

COURSE DURATION :

Intermediate - 3 Semesters : 18 Months. Final - 3 Semesters - 18 Months

COURSE TIMING :

Evening Session – 6.30 to 8.30 p. m. Morning Session – 7.30 to 9.30 a. m.

COURSE FACULTY :

Experienced and Industry Oriented.

ADMISSION AND REGISTRATION :

Last Date : 15th June. Office Hrs. : During 11.30 a. m. to 6.30 p. m.

**Dr. ASHOK JOSHI**

Secretary - in - charge

# लोणावळा येथील स्त्री-मुक्ती शिबिर

शब्दांकन : नीलिमा कुलकर्णी

## महिला विश्व

प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ वि. म. दांडेकरांच्या भारतीय अर्थ विज्ञानवर्धिनी या संस्थेतर्फे दि. ९ ते ११ एप्रिलपर्यंत लोणावळा येथे शिबिर संपन्न झाले.

या शिबिराला साधारण ५० शिबिरार्थींची उपस्थिती होती. आदिवासी भागात काम करणाऱ्या तसेच ग्रामपंचायती, पंचायत-समित्या, बालवाड्या अशा विविध स्तरांतून काम करणाऱ्या महिलांचा त्यात समावेश होता. एप्रिलला सकाळी ९ वाजता पहिले सत्र सुरू झाले. प्रा. नलिनीताई पंडित 'स्त्रीचे अवमूल्यन व त्याला कारणीभूत अर्थव्यवस्था' या विषयावर बोलल्या. समाजात, राजकारणात, कुटुंबात प्रत्येक क्षेत्रावर स्त्री आघाडीवर दिसते. मग अवमूल्यन कसे? असा प्रश्न करून त्यांनी स्पर्धेवर आधारित अर्थव्यवस्था हे त्याचे कारण असल्याचे सांगितले.

प्रगत राष्ट्रांत स्त्रियांची संख्या जास्त दिसते पण आपल्या देशात याउलट चित्र दिसते. याचे कारण आर्थिक क्षेत्रात स्त्रियांची प्रगती कमी आहे. दुसरा मुद्दा त्यांनी असा मांडला की, भारत शेतीप्रधान देश आहे. ऐंशी टक्के लोकांकडे ५० टक्के जमीन आहे, शिवाय शेतमजूर स्त्रिया बहुसंख्य असूनही घटनेने दिलेले अधिकार त्यांच्यापर्यंत पोहोचत नाहीत. त्याचे अर्थव्यवस्थेवरील प्रतिकूल परिणाम शेतमजूर, दलित व आदिवासी स्त्रियांना भोगावे लागतात. त्यांच्या उत्पन्नात वाढ नसल्याने दोन वर्गांतील विषमतेची दरी वाढतेच आहे असे त्या म्हणाल्या. दलित व आदिवासींचा आवाज बंद करण्यासाठी त्यांच्या स्त्रियांवर अत्याचार होतात. त्यातूनही स्त्री सर्वांकडून अत्याचाराची कशी बळी ठरते याकडे नलिनीताईंनी लक्ष वेधले.

वेश्याव्यवसाय व शहरी भागातील कॉलगर्लस या आपला व्यवसाय मजबूरी म्हणून करतात. समाज त्यांच्याकडे मात्र उपभोग्य वस्तू म्हणून पाहत असतो. यातूनही स्त्रीचेच अवमूल्यन होते असे त्यांनी सांगितले. स्त्रीचे अर्थार्जनाचे क्षेत्रही मर्यादित असते हा मुद्दा त्यांनी प्रखरतेने मांडला. शिक्षण, शुश्रूषा या क्षेत्रांत स्त्रियांची संख्या जास्त असते म्हणजे आजही स्त्रियांना परंपरागत स्वरूपात कामे करावीच लागतात याचा त्यांनी खेद व्यक्त केला.

ह्या सर्व मुद्यातून असा निष्कर्ष निघतो की, परंपरागत कामाची आखणी आजही समाजात आहे. त्यातल्या त्यात दुय्यम भूमिकेमुळे स्त्रीचे शोषण होत आहे. या अवमूल्यनाला आळा घालण्यासाठी संस्कृतीसंबंधीचे अवास्तव गोड गैरसमज स्त्रियांच्या मनांतून दूर करून त्यांचे अंधश्रद्धाळू मन खंबीर आणि डोळस बनवावे असा सूचक इशारा जाता जाता त्यांनी दिला.

दुपारच्या सत्राला विद्युल्लता भागवत यांनी सुरुवात केली. 'कुटुंब, समाज, संस्कृती व धर्म' या विषयावर त्यांनी मानवनिर्मितीचा इतिहास, त्यातून निर्माण झालेली कुटुंबव्यवस्था, समाजाचे काळानुसार बदलते स्वरूप इ. ची विस्तृत चर्चा केली.

संस्कृती आणि धर्म यांचे समाजात रूढीनुसार विडंबन झाले, त्याचे चित्र आज समाजात उग्र स्वरूपात दिसते आहे असे त्या म्हणाल्या. उत्पादन व पुनरुत्पादन यांच्यांतून निर्माण होणारी संघटना म्हणजे समाज, असे त्यांनी इतिहासाच्या उदाहरणावरून सांगितले. कुटुंब, समाज, धर्म आणि संस्कृती या चारही क्षेत्रांत स्त्रीच बळी पडली. कुटुंब व्यवस्थेत पुरुषांच्या अंकित राहण्याची प्रक्रिया कित्येक वर्षांपासून आहे. त्यातूनच पुरुष श्रेष्ठत्वाचे तत्त्वज्ञान आले. धर्माच्या व संस्कृतीच्या नावाखाली पातिव्रत्याचे आदर्श, सौभाग्याच्या कल्पनेचे गोडवे, व्रतवैकल्ये व त्यातूनच अंधश्रद्धेची बिजनी स्त्रीच्या मनात रुजली. अंधश्रद्धांवर, तत्त्वज्ञानावर आधारित जो धर्म उभा केला त्या धर्माच्या ओझ्याखाली स्त्रीच्या जाणिवेचे पंखच कापले गेले. म्हणजे प्रत्येक क्षेत्रात स्त्रीलाच दुर्बल बनवले गेले.

१० एप्रिलला सकाळचे सत्र सरिता पदकी यांनी सुरू केले. '१८५० ते १९८२ पर्यंत स्त्रीची वाटचाल' या विषयावर बोलताना त्या म्हणाल्या, १८५० पासून फुले, रानडे, लोकहितवादींनी स्त्रियांचे जीवन सुधारण्यासाठी प्रयत्न केला. तेव्हा आज आपल्याला आजची स्त्री ही थोड्याफार प्रमाणात बहुतेक क्षेत्रांत वावरताना दिसतेय हे आपल्या देशाचे भाग्यच समजायचे. लोकहितवादींच्या 'शतपत्रे', 'समग्र' या दोन पुस्तकांतील संदर्भ त्यांनी दिले. फुल्यांनी आपला दत्तक पुत्र यशवंतचा आंतरजातीय विवाह करून दिला. १०० बालविधवांच्या बाळंतपणाला मदत केली. तसेच लोकहितवादी व विष्णुशास्त्री बापट यांनी विधवा विवाहाला चालना दिली. रमाबाई रानडे यांनी औद्योगिक शिक्षणाची सोय करून दिली असे त्यांनी सांगितले.

सर्व आढावा थोडक्यात घेताना लक्षात येते त्या वेळची समाजरचना बदलण्यासाठी प्रतिकूल परिस्थितीत या थोर नेत्यांनी अपार कष्ट सोसले. त्या काळातील धाडसी पाऊल पाहता आपले प्रतिबिंब आपण निरखण्यास आपण १०० वर्षे मागे आहोत असे जाणवते.

दुपारचे सत्र प्रा. आशा आपटे यांनी 'स्त्री व राजकारण' या विषयाने सुरू केले. स्त्री ही उदासीन का? हा प्रश्न करून त्यांनी पुढील उल्लेख केला स्त्रीची मानसिकता म. गांधींनी निर्माण केली त्या वेळेपासून स्त्री राजकारणात आली. काही निवडणुकांतील आकडेवारी त्यांनी दिली. १९७४–७५ च्या पुणे महानगर-पालिकेच्या निवडणुकीत ५८० पैकी २८

स्त्रियांनी उमेदवारी अर्ज भरले. त्यातील दोन अर्ज नाकारले, आठ महिलांनी अर्ज मागे घेतले, राहिले १८ त्यांपैकी फक्त १ महिला निवडून आली. बाकी सर्व महिलांच्या अनामत रकमा जप्त झाल्या त्यात ३८५५८२ मतदारांपैकी ६,५४६ मते १८ महिलांमिळून होते. यात भाग घेणाऱ्यांपैकी १० समाजकार्यकर्त्या, २ शिक्षिका, १ व्यापारी, १ नोकरी करणारी, १ वकील व ३ गृहिणी होत्या. ही 'आंतरराष्ट्रीय महिला' वर्षात घडलेली घटना आहे. १९७७ साली लोकसभेसाठी १८ राज्यांतून ५४२ जागांसाठी ४२८७ पुरुष तर फक्त १०५ च स्त्रिया उभ्या होत्या आणि निवडून आल्या फक्त १९ स्त्रिया. तर १९८० सालच्या निवडणुकीत ७७३ स्त्रियांनी अर्ज भरले व १८ राज्यांतून फक्त १७ च स्त्रिया निवडून आल्या आणि महाराष्ट्रातून फक्त ३ महिला खासदार म्हणून निवडून गेल्या.

वरील आकडेवारी पाहता स्त्रीनी राजकारणातील उदासीनता वाढत्या प्रमाणात दिसून येते. त्यासाठी सामाजिक क्षेत्रात स्त्रियांनी भरीव काम करून, राजकारणात प्रत्यक्ष सहभाग घेऊन ही उदासीनता दूर करावी असे आशाताईंनी सांगितले. त्याच वेळी शैला कोनलाड यांनी 'स्त्रीचा शिक्षणातील व व्यवसायातील सहभाग' या विषयावर चर्चा केली. व्यवसायात परिचारिका, दाई शिक्षिका यांचे प्रमाण जास्त असल्याचे त्यांनी सिद्ध केले.

शेवटी ११ एप्रिलला शिबिराच्या समारोपाच्या वेळी शिबिरार्थींच्या प्रश्नांना उत्तरे दिली. शिबिरार्थींनी स्त्री म्हणून जीवनात आलेले अनुभव, लहानपणापासून मिळणारी वागणूक वगैरे माहिती आशाताई आपटे यांना लिहून दिली. त्यांपैकी काही स्त्रियांनी आपले अनुभव वाचून दाखवले. काहींचे अनुभव (वैवाहिक) अंगावर शहारे आणणारे होते. शिबिरातील चर्चा अत्यंत मोकळेपणाने झाली. काही स्त्रिया मात्र अतिशय निरुत्साही दिसत होत्या तर युवतींच्या चर्चेतून विचारांनी भारावून काही स्त्रिया खूपच उत्साही होत असल्याच्या दिसत होत्या.

शिबिर अत्यंत उत्साहात व निर्मळ वातावरणात पार पडले. या शिबिरातून नवे विचार घेऊन परतल्यावर स्त्रीमुक्ती चळवळीची आजदेखील पूर्वीइतकीच आवश्यकता आहे हे खरोखर मला पटले. शिबिरार्थींनी जड अंतःकरणाने एकमेकांचे निरोप घेतले.

◎ ◎

## इकडून तिकडे गेले वारे !

# 'पुन्हा, पुन्हा, जोशी–अभ्यंकर !'

### अनिल सोनार

काही आडनावे तीन पायांच्या शर्यतीत भाग घेतलेल्या खेळाडूंसारखी दुसऱ्यांना आपल्या सोबत ओढत आणत असतात. टिळक म्हटले की आगरकर आलेच. आपटे म्हटले की गोखले आलेच. आठवल्यांमागे शहाडे, फडक्यामागे खांडेकर आणि जोशीमागे अभ्यंकर हे ठेवलेले आहेच. जोशी–अभ्यंकर यांचे दुर्दैवी हत्याकांड गाजल्याच जोशी मागे अभ्यंकर हे नाव येणे गरजेचे होऊन बसले. उगाच नाही, शरद जोशी तथा एन. सी. जोशींच्या जोडीला मुकुंद अभ्यंकर हे प्राध्यापकांना शिव्या द्यायला धावून येत! 'जोशी अभ्यंकर सत्ताकांड' तेव्हा कुठे पूर्ण होत असते. 'बहिष्कारावर असलेले प्राध्यापक हे कुत्रे आहेत त्यांच्या डोक्यावर 'लगुड प्रहार' करायला हवा.' असे त्यांनी केलेले विधान हे त्यांच्या 'सु–संस्कृत'पणाचे उदाहरण आहे. 'काठी मारा, धोंडा मारा' असे गावंढळ उद्गार ते काढत नाहीत. अहाहा ! केवढा हा सुसंस्कृतपणा ! पण 'पुटा' किंवा 'पुक्टो' या रानटी जमातीच्या जथ्याला कसली आलीय सभ्यता? जोशी–अभ्यंकरांच्या निषेधाचा ठराव मांडला की, अहो ज्या मराठी जमातीच्या संस्थेला आपले नाव देखील इंग्रजी आद्याक्षरात लिहावे लागते तिला संस्कृत काय कळत असणार? उपानह! (म्हणजे तुकारामांच्या असंस्कृत भाषेत 'खेटर' किंवा 'पैजार') म्हणून जोशी–अभ्यंकर जोडी त्या संस्कृत उद्धाराचा, (चुकलो उद्धरणाचा) अर्थ मराठीत समजावून सांगण्य साठी 'पुटा'च्या सभेत घुसली (पुन्हा चुकलो, आगमन करती झाली!) तर रानटी पुटाच्या सभासदांनी पोलिसांना बोलावून या सुसंस्कृत जोडगोळीस असंस्कृतपणे, पण धक्के न मारता बाहेर घालवून दिले. खरे म्हणजे असे करण्याआधी प्राध्यापकांनी शंभर वेळा विचार करायला हवा होता. अहो 'जोशी-अभ्यंकर' म्हणजे काय लहानसहान असामी आहेत! जोशीबुवा तर विद्यापीठाच्या नौकशी टेबलावर आपल्या तंगड्या टाकून बसलेले असतात. आहे कोणाची हिंमत असली बहादुरी दाखवायची? डेक्कन जिमखान्याच्या रेलिंगवर गळ्याभोवती रुमाल बांधून, शर्टच्या वरच्या गुंड्या उघड्या टाकून गप्पा मारत बसायची आहे कुणा 'सिनेट मेंबर'ची छाती? 'आहेत का रामभाऊ?' अशी सलगीची ठणठणीत आरोळी ठोकनच शरद जोशी कुलगुरूंच्या दालनाचा दरवाजा लोटतात आणि रामभाऊंचेदेखील... माफ करा डॉ. राम ताकवले यांचेही जोशींवर इतके अफलातून वात्सल्य की, आणीबाणीत शरद जोशी फौजदारी गुन्ह्यासाठी जंगलीमहाराज पोलिस चौकीवर दररोज हजेरी देत असूनही त्यांना ते विद्यापीठाच्या बैठकीस हजर राहू देतात! प्राध्यापकांना 'कुत्रे' म्हटले म्हणून ते सभाप्रमुख असूनही साधा निषेधही करत नाहीत. अहो का करतील? यालाच तर म्हणतात जोशी-अभ्यंकर सत्ताकांड! रामभाऊंना ह्याची पूर्ण कल्पना असावी. मुकुंद अभ्यंकरांनी प्राध्यापकांना बेडूक म्हटले, कारण अनेक प्राध्यापकांचे आणि जोशी–अभ्यंकरांचे